काव्य
2826

69

# अरुण दाते आणि अनुराधा पौडवाल यांची गाजलेली गाणी

REFBK 0026464
REFBK-0026464

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. २६२८
संदर्भ काव्य
२६२८
२६४६४
3719010९

# अनुराधा पौडवाल
# अरुण दाते

## यांची गाजलेली गाणी

भक्तिगीते भावगीते चित्रपट गीते
यांचा अप्रतिम संग्रह

संग्राहिका
सौ. सुचिता प्रभाकर आवटी

REFBK-0026464
REFBK-0026464

योगश्वर प्रकाशन, डाबवली (पूर्व)

**प्रकाशिका :**
सौ. सुचिता प्रभाकर आवटी
**योगेश्वर प्रकाशन**
'सुधास्मृती सागर', अ विभाग
ब्लॉक क्र. ८, आयरे क्रॉस रोड,
डोंबिवली (पूर्व) जिल्हा - ठाणे.

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९९१

मूल्य : रु. २५/-

**टाईपसेटिंग :**
**मेकग्राफिक्स**
३/१४, कॅनॉट रोड, हॉटेल अमीर समोर
पुणे - ४११ ००१. फोन : ६६७७५२

**मुद्रक :**
**प्रदीश मुद्रण**
१८० सी, गायवाडी
गिरगांव, मुंबई - ४

लाडक्या अर्चनास,

संगीतमय भेट,

आई.

रसिकहो,

नमस्कार. आज सौ. अनुराधा पौडवाल व श्री. अरूण दाते ह्या दोन गायक कलाकारांनी गायलेल्या गाजलेल्या गाण्यांचे पुस्तक प्रकाशित करताना मला अत्यंत आनंद होतोय. माझ्या ह्या आनंदात आपण सर्व रसिक सहभागी आहातच.

या पुस्तकात दोन्ही गायकांनी गायिलेल्या बहुतांशी गाण्यांचे गीतकार व संगीतकार यांची नांवे देण्याचा मी आटोकाट प्रयत्न केलेला आहे. कांही गाण्यांच्या गीतकारांची व संगीतकारांची नांवे मला मिळू शकली नाहीत त्याबद्दल मी दिलगीर आहे. पुस्तकाच्या पुढील आवृत्तीच्या वेळी ही उणीव भरून काढण्याचा मी जरूर प्रयत्न करीन.

रसिकांनी ही उणीव भरून काढण्याच्या बाबतीत मला कांही सहकार्य केल्यास मी त्यांचे स्वागतच करीन. हे पुस्तक आपल्या पसंतीस येईल अशी अपेक्षा करते.

धन्यवाद.

सौ. सुचिता प्रभाकर आवटी

अनुक्रमणिका

# अनुराधा पौडवाल

## भावगीते


| | |
|---|---|
| अनुरागाचे थेंब झेलती | १ |
| सजणा कशासि अबोला | २ |
| बेभान या रात्री | ३ |
| चंद्र वाटेवरी | ४ |
| डोळ्यावरून माझ्या | ५ |
| हसले हसले | ६ |
| मी वाऱ्याच्या वेगानं | ८ |
| प्रिया साहवेना | १० |
| चांदण्यात झुलतो बाई | १२ |
| प्रिया आज आले | १३ |
| कसली जिवाला भूल पडे | १५ |
| कुण्या देशीचे पांखरू | १७ |
| बंदिनी स्त्री ही | १८ |
| सारे मला मिळाले | २० |
| मी अशी ही | २१ |
| गीत प्रीतीचे कुठे | २२ |
| कधीही नाही कधीच नाही | २३ |
| उंच उंच माझा झोका | २४ |
| हातात हात घेता | २६ |
| रसिका मी कैसे | २७ |
| गाण्यात सर्व माझ्या | २८ |
| प्रीती जडली तुझ्यावरी | २९ |
| मी तर रमते प्रभू चरणासी | ३१ |
| रजनीगंधा जीवनी या | ३३ |
| कां हासला किनारा | ३४ |
| श्यामसुंदरा नंदकिशोरा | ३५ |
| कुहु कुहु कुहु येई साद | ३६ |
| हे सावळ्या घना | ३८ |
| अशीच साथ राहु दे | ३९ |
| घे वंदन तुजला अंबे मां | ४१ |
| गीत हे गाशील तेंव्हा | ४३ |
| मी तुझी कुणी नव्हते | ४४ |
| वक्रतुंड हलवीत शुंड | ४७ |
| तळव्यावर मेंदीचा | ४९ |


## चित्रपट गीते


| | |
|---|---|
| शंभो शंकरा | १ |
| तिन्ही सांजेला प्रभूचरणासी | ३ |
| चंपा चमेली की जाई अबोली | ५ |
| हरे कृष्णा हरे कान्हा | ७ |
| पाळणा तुला घननीळा | ९ |
| तुळजा भवानी महिषासूरमर्दिनी | १० |
| फांदीवरले घर कोसळते | ११ |
| कसा म्हमईचा फौजदार | १३ |
| मराठमोळं गाणं | १५ |
| ओघ मायेचा हा | १७ |
| मी आले निघाले | १८ |
| गगनाच्या छायेखाली | १९ |

| | |
|---|---|
| रंगपंचमी रंगली | २१ |
| अवती भवती फिरून दमलं | २२ |
| मनी गुंफिते मी | २३ |
| साद ओली पाखराची | २४ |
| भरून भरून आभाळ आलंय | २६ |
| दे टाळी मला | २८ |
| ढोलकीच्या तालावर | ३० |
| स्वर्ग त्यापुढे फिका पडे | ३१ |
| गुरूविण नाही दुजा आधार | ३३ |
| हा सागरी किनारा | ३५ |
| झाली फुले कळ्यांची | ३६ |
| कथा सावित्रीची ग ऐकावी | ३७ |
| वारा आला भेटायला | ३८ |
| सर्व दारे बंद झाली | ३९ |
| अश्विनी ये ना | ४० |
| ही नवरी असली | ४२ |
| माझ्या मातीचे गायन | ४४ |
| मी जलवंती मी फुलवंती | ४६ |
| विश्व जोवरी चालेल | ४८ |
| राजा ललकारी अशी | ४९ |
| काळ्या मातीत मातीत | ५१ |
| गुरूने दिला ज्ञानरूपी वसा | ५३ |
| मला असला नवरा नको | ५५ |
| उठ मुकुंदा उठ श्रीधरा | ५८ |
| जिथे प्रीत आहे | ६० |
| भाग्य उजळले या जन्माचे | ६२ |
| सखा अंगाशी माझ्या | ६३ |
| हे गर्द निळे मेघ | ६४ |
| घेऊन जाशी तूंच | ६५ |
| घडून जे गेले ते | ६६ |
| बाळा तुझ्याच साठी | ६७ |
| आज बाई लाजते मी | ६९ |
| इथं जाळं कोण रे | ७१ |
| तुळशी माते तुला | ७२ |
| डोंगर झाडी तालावरती | ७४ |
| ये अबोली लाज गाली | ७६ |
| घनश्याम सावळा | ७८. |
| डोळ्यात डोळा हातात हात | ८० |
| जो जो गाते झोका देते | ८२ |
| निशाणा तुला दिसला ना | ८४ |
| घर दोघांचे | ८६ |
| हे चांदणे फुलांनी | ८७ |
| भले बुरे ते घडून गेले | ८८ |
| तुझी माझी जोडी जमली | ९० |
| कान्हा ऽऽऽ ओ ऽऽऽ कान्हा | ९३ |
| घुमला हृदयी निनाद हा | ९५ |
| इंद्रबनातील मी पाकोळी | ९७ |
| रात अशी ही प्रीत रसिली | १०० |
| ऋतू हंसताना तू असताना | १०२ |
| दिसते मजला सुखस्वप्न | १०३ |
| रेखिले मनात जे | १०५ |
| ते बंध चांदण्याचे | १०६ |
| नवतीच्या रानात | १०७ |
| नाथांचे हे घर | १०९ |
| सांगु कशी प्रिया मी | ११० |
| सजा ही का अपराधाविना | ११२ |
| माऊलीच्या भेटीसाठी | ११३ |
| मी सूर छेडिता | ११४ |
| मी कशी ओळखू प्रिती | ११६ |
| स्वप्नात चांदण्याच्या | ११७ |
| चोरीचा मामला मामाही थांबला | ११८ |

# अनुराधा - एक साठवण

* सौ. अनुराधा पौडवाल ह्यांचे लग्नाआधीचे नांव अलका नाडकर्णी.
* सचिनदेव बर्मन ह्यांनी अनुराधाला 'अभिमान' या चित्रपटातील श्लोक गाण्याची संधी दिली. आणि येथुनच अनुराधा यांच्या पार्श्वगायनाला सुरूवात झाली.
* 'यशोदा' या मराठी चित्रपटातील दत्ता डावजेकर यांच्या संगीत दिग्दर्शनाखालील 'घुमला हृदयी निनाद हा' या गीताबद्दल १९७३ साली अनुराधा यांना सूरसिंगारचे 'मियां तानसेन' अॅवॉर्ड मिळाले.
* 'अरे संसार संसार, 'कैवारी', या चित्रपटातील गीतांबद्दल महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार त्यांनी मिळविले.
* हिंदू संस्कृतीचा ठेवा असणारे काव्य आणि गीतरचना अनुराधाने सुपर कॅसेट इंडस्ट्रिजच्या मदतीने लोकांपर्यंत पोचविल्या. गणपती अथर्वशीर्ष, गुरूचरित्र, मनाचे श्लोक, रामरक्षा, रूद्रपाठ, साईगीते आरत्या हे सर्व लोकांच्या पसंतीस उतरले आहे.

अनुराधा ह्यांना सुंदर आवाजाबरोबरच सुंदर हसरे रूपही देवाने दिलेले आहे. अनुराधाच्या रसिक चाहत्यांच्या घरात अनुराधाचा फोटा हमखास दिसतोच दिसतो.

अनुराधा आणि अरूण दाते ह्यांनी गायिलेल्या मराठी भावगीतांना तर रसिकांनी भरपूर दाद दिली.

संग्राहक

श्री. नंदकुमार वसंत सातुर्डेकर

(बी. कॉम. एल. एल. बी. सी. जे)

पत्रकार.

# अनुरागाचे थेंब झेलती

संगीत- अशोक पत्की

गीत - शांताराम नांदगांवकर

अनुरागाचे थेंब झेलती प्रीत लतेची पाने
तुझ्या नि माझ्या भेटीमधुनी
फुलती धुंद तराणे ।।धृ०।।

मंतरला ऽ ऽ हा कुंज लाजरा
महिवरला सुमगार गारवा
झिरमिर झिरमिर पाऊस धारा
गाती श्रावण गाणे ।।१।।

मधुमय हा मृदगंध वाहतो
बहरुनिया बन वृंद नाचतो
तरु वेलींनां अशी बिलगती
अधिरा प्रीतीसुखाने ।।२।।

• • •

# सजणा कशासि अबोला

संगीत : अनिल अरुण

गीत : वंदना विटणकर

सजणा कशासि अबोला
घडला असा रे माझा काय गुन्हा ।।धृ०।।

छळितो मजसी हा दुरावा
ध्यास तुझा जुलमी
मोहरली वसुधा तरी का
श्रावण हा विरही
नवरंगी पुकारी माझी साद तुला ।।१।।

भास तुझा फुलवी सुखाचा
पारिजात हृदयी
आज मनी झुलते अनोखी
व्याकुळल्या समयी
रतिरंगी बुडाली अशी चंद्रकला ।।२।।

• • •

# बेभान या रात्री

संगीत : अनिल अरुण

गीत - यशवंत देव

बेभान या रात्री बेबंद झाले रे
अधिर मी अन् अधिर तूं ही
अधिर हे वारे ॥धृ०॥

दोन हातांच्या झुल्यावर अंग झोकिन मी
अमृताचे दान घेता तृप्त होईन मी
मीलनाला साक्ष देतील लक्ष हे तारे ॥१॥

चांदण्यांचा धुंद मेळा नाचतो गगनी
गंध शोधित भृंग ही आले पहा रानी
स्पंदनांनी उर भरला कहर झाला रे ॥२॥

• • •

# चंद्र वाटेवरी

संगीत - अशोक पत्की

गीत - गोपाळ मयेकर

चंद्र वाटेवरी एकटा चालतो
चालतांना खुणावून कां हांसतो ।।धृ०।।

त्या कळाली कशी दो जीवांची कथा
जाणली कां तयाने मनीची व्यथा
ओ ऽऽऽऽऽ
चंदनी स्पर्श अंगावरी शिंपतो ।।१।।

संथ लाटांवरी बिंब हेलावतो
ओळखीचे तुझे रुप साकारते
ओ ऽऽऽऽऽ
चोरट्या कौतुकाने मला छेडितो ।।२।।

पाणजाळीत कां थांबले चांदणे
जाणले अंतरी गूढ ते सांगणे
ओ ऽऽऽऽऽ
स्वप्न भेटीत दोघांस बोलावितो ।।३।।

• • •

# डोळ्यांवरून माझ्या

संगीत : अनिल अरूण

गीत - मंगेश पाडगांवकर

डोळ्यांवरून माझ्या उतरून रात्र गेली
वचने मला दिलेली विसरून रात्र गेली ॥धृ०॥

डोळ्यांत जन्म सारा, दाटून डोह झाला
अश्रुंत चंद्र माझ्या विखरून रात्र गेली
वचने मला दिलेली विसरून रात्र गेली ॥१॥

मी मानिले मनाशी माझेच सर्व कांही
स्वप्नात हाय माझ्या बहरून रात्र गेली
वचने मला दिलेली विसरून रात्र गेली ॥२॥

• • •

# हसले हसले

संगीत : प्रभाकर जोग

गीत - जगदीश खेबुडकर

हसले ऽऽऽऽ हसले ऽऽऽ
हरवून मला मी बसले ||धृ०||

कळी मी अबोल होते
वारा लबाड आला
मी अंग चोरीले ग
हळुवार स्पर्श झाला
क्षण ते दंवात भिजले
हसले ऽऽऽ हसले ||१||

देठातुनी फुलावे
हितगुज एक ओले
कुजबुज पापण्यांची
गंधात रंग बोले
सारे मनात ठसले
हसले ऽऽऽ हसले ||२||

वेलीवरि धुक्याच्या
फुटता नवा शहारा
स्वप्नात जागले मी
छेडीत चंद्र तारा
स्वर ते अबोध कसले
हसले ऽऽऽ हसले ।।३।।

ओशाळल्या मनाला
जाणीव आज लाजे
मजला मिळून सारे
कांही न आज माझे
म्हणूनी उगाच रुसले
हसले ऽऽऽ हसले ।।४।।

• • •

# मी वाऱ्याच्या वेगाने

संगीत: अरुण पौडवाल

गीत - शांताराम नांदगांवकर

मी वाऱ्याच्या वेगाने आले
तुझ्या प्रीतीने धुदं झाले
वसंतातले रंग ल्याले
अशा रेशमी सांजवेळी
तुझे गीत झंकारताना, सूर प्याले ॥धृ०॥

बेहोश वेळी अशा
गाण्यात आली नशा
आनंद ओसंडताना
बेधुदं झाल्या दिशा
कुठे पानपानात हाले
तसे फुल लाजून बोले
तुझी पाकळी मीच झाले ॥१॥

आभाळ गंधाळताना
दो जीव स्वप्नाळताना

श्वासात ही कैफ आला
हे चांदणे सांडताना
तुझा स्पर्श होताच गाली
मनी मलमली हालचाली
क्षणी चंद्रगंधात न्हाले ।।२।।

• • •

# प्रिया साहवेना

संगीत : अनिल अरुण

गीत - यशवंत देव

प्रिया साहवेना आता एकलेपणा
अशा पौर्णिमेच्या रात्री
कसा दाह होतो गात्री
सांगु रे कुणा,
आता सांगु रे कुणा ॥धृ०॥

घातली जुईची वेणी
तुझ्या आवडीची
वाट पाहताहे गंध
तुझ्या मीलनाची
जरा शोध घे रे वाऱ्या
कुठे सांडल्या रे साऱ्या,
प्रीतीच्या खुणा
साऱ्या प्रीतीच्या खुणा ॥१॥

येईना कशी रे कानी
तुझी आर्त साद
काय बोलले मी माझा
कोणता प्रमाद
तुझे मौन कैसे साहु
नको या परि दुखावू
पोळल्या मना
माझ्या पोळल्या मना ।।२।।

• • •

# चांदण्यात झुलतो बाई

संगीत - श्रीधर फडके

गीत - प्रवीण दवणे

चांदण्यात झुलतो बाई गंध मोगरा
गंधामधुनी भिजतो ग चंद्र साजिरा ।।धृ०।।

पीस मयुरी अलगद हे या हृदयातुनी
पहिली प्रिती साद घालीते या गाण्यातुनी
निळावल्या स्वप्नांचा मोर नाचरा,
गंधामधुनी भिजतो ग चंद्र साजिरा ।।१।।

मोहरल्या वाटा आता मंतरली राने
हुरहुरल्या शपथा येथे झुरमुरली पाने
अधरांच्या स्पर्शाचा ध्यास बावरा
गंधामधुनी भिजतो ग चंद्र साजिरा ।।२।।

तळहातावर भिजली मेंदी स्वप्न होऊनी,
ओठावरती रुजले गाणे जन्म होऊनी
ध्यासांचा हो भासांचा गोड भोवरा
गंधामधुनी भिजतो ग चंद्र साजिरा ।।३।।

• • •

# प्रिया आज आले

संगीत : अरुण पौडवाल

गीत - शांताराम नांदगांवकर

प्रिया आज आले मैफलीत माझ्या
रंगसूर ल्याली पश्चिमा ऽऽऽऽ
गीतास आली लालिमा ऽऽऽऽ
ओऽऽऽऽ प्रिया आज आले ॥धृ०॥

तुझी साद ऐकुनी मी रे
फुलारून आ ऽऽऽऽ ले
सुरातल्या चैतन्याने
मीच गीत झाले
अमृतात न्हाली पौर्णिमा ऽऽऽऽ
प्राणात उमले चंद्रमा
ओ ऽऽऽऽ प्रिया आज आले ॥१ ॥

हळुहळु निशिगंधाचे
प्रीतस्पर्श ल्या ऽऽऽऽ ले

निशांत हा होता मी रे
उषास्वप्न झाले
लाविता तुझ्या मी कुंकुमा
हासेल प्राची नीलिमा
ओ ऽऽऽऽ प्रिया आज आले ॥२॥

• • •

# कसली जिवाला भूल पडे

संगीत - अनिल अरुण

गीत - शांताराम नांदगावकर

कसली जीवाला भूल पडे
हरीच्या मुरलीवर जीव जडे ॥धृ०॥

श्यामल श्यामल मेघा बघुनी
श्याममयी मी जाते बनुनी
स्वप्न म्हणू की हे जागेपण
माझ्यासंगे नाचे मोहन
श्याम, श्याम, श्याम, घनश्याम श्याम, श्याम,
श्याम, श्याम, श्याम, मुखी एक नित्य नाम
संसार मनातुन गळून पडे ॥१॥

मज वेडीला ऽऽऽऽ आ ऽऽऽऽ
मजवेडीला निंदा वंदा
मी तर वरिले बाल मुकुंदा
लाज न मजसी, मजसी न भीती

माझी हरीवर अक्षय प्रीती
श्याम, श्याम, श्याम, घनश्याम श्याम, श्याम,
श्याम, श्याम, श्याम, मुखी एक नित्य नाम
त्याच्याविण माझा श्वास अडे ॥२॥

• • •

# कुण्या देशीचे पाखरू

संगीत - श्रीधर फडके

गीत - सुधीर मोघे

कुण्या देशीचे पाखरू, माझ्या अंगणात आले
त्याचे पंख परदेसी, परी ओळखीचे डोळे [२]
माझ्या अंगणात आले ॥धृ०॥

माती कुठल्या धरेची, त्याच्या नखांना लागली
माया हिरवी कोणती, त्याच्या उरात सांठली
आणि कोठले आकाश, त्याने सर्वांगा माखले [२]
माझ्या अंगणात आले ॥१॥

कुठे पिऊन घेतले त्याने मेघातले जळ
दिली वाऱ्याने कोठल्या त्याला चोचीतली शीळ
त्याच्या लकेरीत गाणे कुण्या जन्मीचे भेटले [२]
माझ्या अंगणात आले ॥२॥

माझ्या ओंजळीचे झाले, मऊ घरटे साजस
त्याला न्हाऊ घालावया, ओला काजळ पाऊस
माझे मन त्याच्यासाठी, फांदी होऊनिया झुले [२]
माझ्या अंगणात आले ॥३॥

• • •

# बंदिनी स्त्री ही

संगीतः हृदयनाथ मंगेशकर

गीत - शांताराम नांदगांवकर

आ ऽऽऽऽऽऽ बंदिनी
बंदिनी, स्त्री ही
बंदिनी बंदिनी
हृदयी पान्हा नयनी पाणी
जन्मोजन्मीची कहाणी ॥धृ०॥

आ ऽऽ आ ऽऽऽ आ ऽऽऽऽ
रूप बहिणीची माया देई
वात्सल्यमूर्त आई होई
माहेरा सोडून येई
सासरी सर्वस्व देई
हृदयी पान्हा नयनी पाणी
जन्मोजन्मीची कहाणी, बंदिनी ऽऽऽ ॥१॥
ओ ऽऽऽ ओ ऽऽऽ

कधी सीता कधी होई कुंती
सावित्री ती दिव्य शक्ती
शकुंतला तूंच होसी
मीरा ही प्रीत दिवाणी
हृदयी पान्हा नयनी पाणी
जन्मोजन्मीची कहाणी, बंदिनी ऽऽऽ ।।२।।

युगे युगे भावनांचे धागे
जपावया मन तुझे जागे
बंधने ही रेशमाची
सांभाळी स्त्रीच मानिनी
बंदिनी स्त्री ऽ ऽ ही बंदिनी ।।३।।

• • •

# सारे मला मिळाले

संगीत : अरुण पौडवाल

गीत - मंगेश पाडगांवकर

सारे मला मिळाले कांही न मागता
कळले अपार सारे कांही न सांगता ।।धृ०।।

आ ऽऽऽऽऽऽ
आता पहाट झाली माझी ललाट रेषा
नि:शब्द केशराची ही हांक रंगता ।।१।।

चंद्रासवे पहाटे भाषा बुडून गेली
पाणी अथांग झाले हे प्राण जागता ।।२।।

माझेच श्वास झाले आता नव्या दिशा या
ये मोगरा फुलोनी हा सूर लागता ।।३।।

●●●

# मी अशी ही

संगीत : अशोक पत्की

गीत - शांताराम नांदगावकर

मी अशी ही बांधलेली, मी कशी स्वप्नांत येऊ
या तुझ्या गीतास वेड्या मी कशी स्वरसाज देऊ ।।धृ०।।

हे असे विझतात डोळे तूं नको स्वप्नांत येऊ
मदिर हळवी गीत सुमने माझिया केसांत खोवू
या सुखाने भारलेला गंध कैसा सांग लेवू ।।१।।

प्रीतीच्या जड श्रृंखलांनी पाय हे बांधुन घेते
अन् स्वरांच्या कंपनांना काळजाची साथ देते
काजळी रात्रीस कुठवर लोचनांचे दीप लावू ।।२।।

• • •

# गीत प्रीतीचे कुठे

संगीत : अनिल अरुण

गीत - यशवंत देव

गीत प्रीतीचे कुठे
हरवले सखया
हृदयात आर्त नाद
आज लागले झुराया ।।धृ०।।

अंगणातली फुले रंगहीन कां ?
हिरमुसलेली
निर्झरातले तरंग शब्दहीन कां ?
वैराण जीव एक स्वप्न लागतो बघाया ।।१।।

आपसांतले धुके जायचे कधी
कधी रे सजणा
दोन जीव एकजीव व्हायचे कधी
लागे कशी स्नेहहीन ज्योत ही विझाया ।।२।।

• • •

# कधीही नाही कधीच नाही

संगीत - अरुण पौडवाल

गीत - शांताराम नांदगांवकर

कधीही नाही कधीच नाही
प्रीत तुला हे कळली नाही
कधी नयनांनी बोलायाची
रीत तुला कळली नाही ॥धृ०॥

समई मधल्या वाती परि या
मी तुजसाठी जागत होते
तुझ्या मनी परि प्रेमळतेची
ज्योत कधीही जळली नाही ॥१॥

मी हृदयाचे मंदिर करुनी
मूर्त तुझी रे त्यात ठेविली
चुकुनी कधी पण तुझी पाऊले
या वाटेला वळली नाही ॥२॥

• • •

# ऊंच ऊंच माझा झोका

संगीत - यशवंत देव

गीत - इंदिरा संत

ऊंच ऊंच माझा झोका
झोका बांधला आकाशाला
झोका चढता उतरता
होतो पदर वारा वारा,
ऊं ऊं ऊं ।।धृ०।।

झोक्याला देते वेग
पाय टेकून धरणीला
लाल मातीच्या परागाचा
रंग चढतो पावलाला
ऊंच ऊंच माझा झोका ।।१।।

झोका चढतो पूर्वेवर
पूर्वेवर, पूर्वेवर
जाई जुईनी सांवरीला
दवा,धुक्याचा शुभ्र साज

अंगावरती चढविला
ऊंच ऊंच माझा झोका ॥२॥

झोका चढतो पश्चिमेला
वेल लाल नदीचे तोंल
मोकळ्या केसामध्ये गुंफी
सनया लाल लाल
ऊंच ऊंच माझा झोका ॥३॥

झोका चढतो ऊंच ऊंच
पाय पोचती मेघावरती
इंद्राच्या डोहावरती,
लाल पाखरे पाण्या येती
उंच उंच माझा झोका ॥४॥

झोका चढतो ऊंच ऊंच
ऊंच ऊंच मला थाबता थांबवेना
गुंजऐवढे माझे घर
त्याची ओळख आवडेना ॥५॥

• • •

# हातात हात घेता

संगीत : अनिल अरुण

गीत - वंदना विटणकर

हातात हात घेता तूं काल गुंफलेले
पडसाद भावनांचे माझ्या मला मिळाले ।।धृ०।।

तूं धुंद रानवारा की स्वप्न लोचनीचे
शब्दात आज न्हाले हे भाव अंतरीचे
ओठातुनी स्वरांचे फुलपाखरू उडाले ।।१।।

मी मोहरून आले वाटे खुषीत गावे
हे वेड चांदण्याचे हृदयी भरून घ्यावे
आवेगल्या मिठीचे नि:शब्द प्रेम प्याले ।।२।।

• • •

# रसिका मी कैसे

संगीत - अरुण पौडवाल

गीत - वंदना विटणकर

रसिका मी कैसे गाऊ गीत
दाटून आले घन आसवांचे
मिटलेल्या पापणीत, रसिका मी कैसे ॥धृ०॥

तुटल्या मनाच्या हळुवार तारा
गेला सुरांचा जळुनी फुलोरा
नाते प्रणयलयीत, रसिका मी कैसे ॥१॥

मैफल सुखाची झाली विराणी
पुरे वेदनांची जखमी कहाणी
रडते स्वप्न व्यथित रे रसिका मी कैसे ॥२॥

• • •

# गाण्यात सर्व माझ्या

संगीत : अरुण पौडवाल

गीत - मंगेश पाडगांवकर

गाण्यात सर्व माझ्या माझे इमान आहे
ज्याचे खरे न गाणे तो बेईमान आहे ।।धृ०।।

येता समोर दुःखे तो षड्ज झेलला मी
काट्यावरि स्वरांची झुलती कमान आहे
ज्याचे खरे न गाणे तो बेईमान आहे ।।१।।

झाडात पावसाच्या बेहोश आरतीला
वाजे मृदंग तेथे माझाच प्राण आहे
ज्याचे खरे न गाणे तो बेईमान आहे ।।२।।

आयुष्य पेटतांना ओठात सूर होता
ये सोसणे सुराला माझ्या प्रमाण आहे
ज्याचे खरे न गाणे तो बेईमान आहे ।।३।।

• • •

# प्रीती जडली तुझ्यावरी

संगीत - यशवंत देव

गीत - शांता शेळके

प्रीती जडली तुझ्यावरी
कळेल कां ते तुला कधी
कळेल कां ते तुला कधी
काय उमलते मनामधी ॥धृ०॥

नजर भेटता नजरेला
बिंब लोचनी ते ठसते
धडधडते काळीज उरी
वीज नसा मधूनी फिरते
ओठावर जे अडखळते
ओळखशील कां सांग कधी ॥१॥

पैलतीरावर मूर्ती तुझी
वाट बघे मी ऐलतीरी
पावा घुमतो एक इथे
सूर भरी लहरी लहरी

कसे पोचवू गीत तुला
अफाट वाहे मधे नदी ।।२।।

ताण सोसवे मुळी न हा
व्याकुळ झाला जीव आता
फुलल्या वाचुन सुकायची
अशीच कां ही प्रेमकथा
साद घातली मी तुजला
देशील तू पडसाद कधी ।।३।।

• • •

# मी तर रमते प्रभू चरणांशी

संगीत : अशोक पत्की

गीत - यशवंत देव

मी तर रमते प्रभू चरणांशी
होऊन त्याची दासी
कां ऽऽ उगा पतंगा जळशी ।।धृ०।।

मला धुंदीचा गंध न कळतो
जीव प्रभूस्तव हा तळमळतो
तूं तर वेड्या प्रीतीभुकेला
मी परी पावन तुळशी
कां ऽऽऽ उगा पतंगा जळशी ।।१।।

एक कळे मज सदा जागणे
नाथांच्या कीर्तनांत रमणे
माझी मिण मिण नकळत मिळते
त्यांच्या दिव्य प्रकाशी
कां ऽऽऽ उगा पतंगा जळशी ।।२।।

थांबव नाजुक पंख जाळणे
मजसाठी तव जिवास छळणे
पहा लोचने भिजती पांखरा
खुपते शल्य उराशी
कां ऽऽऽ उगा पतंगा जळशी ।।३।।

• • •

# रजनीगंधा जीवनी या

संगीत - अरुण पौडवाल

गीत - शांताराम नांदगावकर

आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ
रजनीगंधा जीवनी या बहरुनी आली.
मनमीत आला तिच्या पाऊली
रजनीगंधा जीवनी या बहरुनी आली ॥धृ०॥
फुलल्या मनाच्या मुक्या पाकळ्या
झुलल्या लता आज प्रीतीतल्या
अशी आली प्रीती ल्याली
नवी ही ऽ ऽ ऽ ऽ ऽ कळी
रजनीगंधा जीवनी या बहरुनी आली ॥१॥
रजनी अशी ही निळी सांवळी
किरणात न्हाली धरा मखमली
अशा वेळी प्रिया येई
फुले ला ऽ ऽ ऽ ऽ ऽ जली
रजनीगंधा जीवनी या बहरुनी आली ॥२॥

• • •

# कां हासला किनारा

संगीत -

गीत -

कां हासला किनारा, किनारा
पाहून धुंद लाट
पाहुनिया नभाला कां हासली पहाट ।। धृ०।।
होती समोर माया गंभीर सागराची
संगीत मरमराचे किलबील पाखरांची
काठावरी उभी मी तूं न्याहाळीत काठ ।।१।।

चाहुल जाणीवेची स्पर्शातूनी गळाली
भारावल्या कळीला जणू पाकळी मिळाली
कमलापरी जुळावे हे स्वप्न रम्य हात ।।२।।

का हासला किनारा पाहून धुंद लाट

• • •

# श्यामसुंदरा नंदकिशोरा

| संगीत - | गीत - |
|---|---|

श्यामसुंदरा नंदकिशोरा भुलवी तुझा अनुराग
मन पाखरा कशी आवरू तू सांग सांग सांग सांग
चित्तचकोरा ।।धृ०।।

तुझ्या प्रीतीची धुंद बासरी दरवळते हृदयात
युगायुगाचे नाते आपुले फुलारले क्षितिजात
सोनरंगी ही तव मोहिनी सरे भान भान भान भान
रे मनमोरा ।।१।।

दिशादिशांना व्यापून उरले रूप तुझे अनिवार
जिवा शिवाचे घडले मीलन बरसे अमृत धार
तव चिंतनी बघ लोपले मन प्राण प्राण प्राण प्राण
रे घननीळा ।।२।।

• • •

# कुहु कुहु कुहु येई साद

| संगीत - | गीत - |
|---|---|

कुहु कुहु कुहु येई साद
उधळीत वनी स्वर तुषार
मधुर हे तराणे
ऋतुराज आज
आ ऽ ऽ ऽ ला ऽ ऽ ऽ ।।धृ०।।

सुमनांचे रंग रंग
ऋतु रंगीत झाले
गंध गीत रची चंचल
अवनीवर दरवळले
वारा भिरभिर हा तोडी बंध ।।१।।

सा ग म ध नी प म २
नी म प ग ग म नी
ध नी सा नी सा
प ग ग म रे सा नी सा
ध नी रे सा सा नी प म

आ ऽ ऽ ऽ ऽ
विहगांचे अंतरंग
मदमंथर झाले
स्वप्न शिल्प कलिकांच्या
अधरावर थरथरले
सारे स्थिरचर बघ होई धुंद ।।२।।

• • •

# हे सावळ्या घना

संगीत -

गीत -

हे ऽ ऽ सावळ्या घना
कां छेडिसी मनाच्या अशा
तारा पुन्हा पुन्हा ।।धृ।।

पानातुनीया मोहूनी गाणे जलाचे फुले
गाण्यातुनी त्या दाटूनी झेले फुलांचे भासले
वारा हळू हा प्रीतीस्वरांनी झुलवी तृणा तृणा ।।१।।

थेंबाकरी हा नाचवी पक्षी स्मृतींचा तुरा
त्या आठवांनी भारले माझ्या मनाचा अंबरा
आता प्रियाची चाहुल ऐसी भुलवी कणा कणा ।।२।।

हुं ऽ ऽ ऽ हुं ऽ ऽ ऽ
हे सावळ्या घना.

• • •

# अशीच साथ राहू दे

संगीत - अरुण पौडवाल

गीत- शांताराम नांदगांवकर

दोघे - ला ऽ ला ऽ ऽ ऽ ला ल ला ऽ ऽ ऽ
तो अशीच साथ राहू दे
फुलास सौरभाची
ती - अशीच रात राहू दे
प्रसन्न चांदण्याची ।।धृ०।।

तो ` अशा युगात लाभल्या
सुखावल्या क्षणात
मिटुन लोचने तुला
मिठीत सावरीत
तार छेडिता स्वरात,
रास चुंबनांची।।१।।

ती - अशीच रात राहु दे
प्रसन्न चांदण्याची
ती - स्पर्श स्पर्श वेचिते
तुझाच चंदनाचा

मोहरे मनात गंध
प्रीत बंधनाचा
मी जपून ठेवते स्मृती
स्मृती अशी सुखाची
तो - अशीच रात राहु दे
प्रसन्न चांदण्याची॥२॥

तो - या पुढे कधीच दूर
जाऊ तू नकोस
ती - घे मिटून काळजात
या मुक्या कळीस
दोघे - ही ऋणानुबंधने
अशी युगायुगांची
ती - अशीच रात राहू दे
प्रसन्न चांदण्याची॥३॥

• • •

# घे वंदन तुजला अंबे मा

संगीत - विलास जोगळेकर

गीत - वंदना विटणकर

अंबे मां जगदंबे मां
देवी भवानी शक्ती मा ।।धृ०।।

चरणी तुझ्या सुखशांती मिळते
दृष्टवासना मनी न उरते
प्रगटरुप तू चित्‌शक्तीचे
तूच रमा अन्‌ तूच उमा
घे वंदन तुजला अंबे मा ।।१।।

वीर शिरोमणी प्रतापराणा
मंत्र स्फूर्तीचा दिलास त्यांना
रणी तळपले सूर्यासम ते
शौर्याला नाही उपमा
घे वंदन तुजला अंबे मा ।।२।।

अंबाजी तूं जनकल्याणी
कुलदैवत तुज म्हणती कोणी
तोषविसी तव भक्तजनांना
कृपावती तू मनोरमा
घे वंदन तुजला अंबे मा ।।३।।

सत्त्व राखिले देवजनांचे
मर्दन केले दुष्टात्म्यांचे
अथांग महिमा तव मायेचा
महेश्वरी तुज नमो नमः
घे वंदन तुजला अंबे मा ।।४।।

• • •

# गीत हे गाशील

संगीत : अरुण पौडवाल

गीत - मंगेश पाडगांवकर

गीत हे गाशील तेंव्हा
मी जगी असणार नाही
प्रीत ही स्मरशील तेंव्हा
मी तुला दिसणार नाही ||धृ०||

कालचे ना आज पाणी
अर्थ हे उरणार नाहीत्
पाहुनि चंद्राकडे मी
आंसवे पुसणार नाही ||१||

चांदणे बिलगेल अंगा
कोवळे रेशीम होऊन
त्या क्षणी पाऊल माझे
हे पुन्हा फसणार नाही ||२||

• • •

# मी तुझी कुणी नव्हते

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

मी तुझी कुणी नव्हते
आणि कुणी नाही
विसर सर्व घडलेले
विसर तू मलाही ।।धृ०।।

झुरते बन माडाचे
आणि शुक्र तारा
भरतीचे स्वप्न बघत
विकल हा किनारा
रंग रंग विरलेले
खिन्न दिशा दाही
विसर सर्व घडलेले
विसर तू मलाही ।।१।।

सांज वेळा संथ डोह
हाक जीव घेणी

शब्दाविण डोळ्यानी
वाचिली ऽ ऽ ऽ कहाणी
तो वेडा स्पर्श काय
छळील रे तुला ही
विसर सर्व घडलेले
विसर तू मलाही ॥२॥

का चुकल्या वाटा
अन् का घडल्या भेटी
कां जपले दव हळवे
गीत तुझ्यासाठी
सूर सूर बुडले रे
अदय या प्रवाही
विसर सर्व घडलेले
विसर तू मलाही ॥३॥

सूर मनातील कधीही
आणु नये ओठी
लावू नये जीव असा
कधीच कुणासाठी
निर्माल्यच एक रात

गंध उडून जाई
विसर सर्व घडलेले
विसर तू मलाही ।४।।

पुढल्या जन्मीच पुरे
हे अधुरे गाणे
पुढल्या जन्मीच खरे
स्वप्न हे दिवाणे
चुरलेली शपथ तिथे
विसरणार नाही
विसर सर्व घडलेले
विसर तू मलाही ।५।।

• • •

# वक्रतुंड हलवीत शुंड

संगीत - नंदू होनप

गीत - प्रविण दवणे

वक्रतुंड हलवीत शुंड मंचकावरी हा आला
लाभवी मेघ धर कटी वाघ
अन् रूळती मौक्तिक माळा
शोभतो साज पखवाज गाजे
डौलात नाद हा झाला

नाचे रूणझुण असा गणपती
छुमछुमणाऱ्या मधुर स्वरांनी
पैंजण चरणी ऽ ऽ ऽ गाती ।।धृ०।।

नर्तनरंगी तालही रमले
निनादताना सूरही नमले
कंठामधले मोती सुंदर
हृदयी लखलखती
नाचे रूणझुण असा गणपती ।।१।।

टिळा केशरी लावून भाळा
हासत खेळत गजमुख आला
त्रैलोक्याची सर्व सुखे ही
चरणाशी झुकती
नाचे रूणझुण असा गणपती ॥२॥

रूप पाहुनी देवही भुलले
ध्यानामधुनी भान हरपले
ओंकाराच्या सुगंध लहरी
अधरी दरवळती
नाचे रूणझुण असा गणपती ॥३॥

• • •

# तळव्यावर मेंदीचा

संगीत - अरुण पोडवाल

गीत - शांताराम नांदगावकर

सुरेश - तळव्यावर मेंदीचा अजुन रंग ओला
अजून रंग ओला
अनुराधा - माझ्या मनी प्रीत तुझी घेते हिंदोळा
सुरेश - तळव्यावर मेंदीचा अजुन रंग ओला ।।धृ०।।

सुरेश - गायिलेस डोळ्यांनी एक निळे गाणे
एक निळे गाणे
बट हळवी वाऱ्यातील वेचिते तराणे
नकळत तव हात प्रिये हाती मम आला
हाती मम आला
अनुराधा - माझ्या मनी प्रीत तुझी घेते हिंदोळा ।।१।।

अनुराधा - पवनातुनी शीतलता दाटुनिया आली
दाटुनिया आली
दोन मने प्रीतीच्या गंगेतच न्हाली
गंगेतच न्हाली

आसमंत आनंदे धुंद धुंद झाला
सुरेश - तळव्यावर मेंदीचा अजुन रंग ओला ।।२।।

सुरेश - ही दुपार भिजलेली प्रीत चांदण्यात
प्रीत चांदण्यात
मिटुनी पंख् बघ निवांत शांत तरूलतात
शांत तरूलतात
अनुराधा - आज तुझ्या सहवासी जीव धन्य झाला.
माझ्या मनी प्रीत तुझी घेते हिंदोळा ।।३।।

• • •

# चित्रपट गीते

# शंभो शंकरा

संगीत - सुधीर फडके

गीत - सुधीर मोघे

अनुराधा - शंभो ऽ ऽ ऽ शंकरा
करुणाकरा, जग जागवा
शंभो ऽ ऽ ऽ ।। धृ०।।

अनुराधा - अंधार हा लोपवा द्यावा प्रकाश नवा
चराचरा उजळाया चैतन्याची ज्योत पेटवा
हे शिवा, शंभो ऽ ऽ ऽ ऽ ।। १ ।।

कोरस - सांबसदाशिव हे त्रिपुरारी शंभो
हे भवतारक दुःख निवारी शंभो
अनुराधा - संमार्जिली अंगणे पान्हावली गोधने
आंसावला आसमंत अमृतानें चिंब नाहवा
हे शिवा, शंभो ऽ ऽ ऽ ऽ ।। २ ।।

कोरस - सांब सदाशिव हे त्रिपुरारी शंभो
हे भवतारक दुःख निवारी शंभो

अनुराधा - तू आपदा वारणारा
तू दुःखिता तारणारा
होई कृपावंत विश्वातले आर्त
अभयंकरा शांतवा
हे शिवा, शंभो ऽ ऽ ऽ
कोरस - सांब सदाशिव हे त्रिपुरारी शंभो
हे भवतारक दुःख निवारी शंभो ॥३॥

**चित्रपट - थोरली जाऊ**

# तिन्हीसांजेला प्रभू चरणांसी

संगीत - दीपक पाटेकर.

गीत - प्रवीण दवणे

तिन्हीसांजेला प्रभू चरणांसी
एक नित्य प्रार्थना
तिमिर जळू दे ज्योत उजळू दे
हीच मनोकामना ॥धृ०॥

ओलांडून हा सोन उंबरा
लक्ष्मी आली घरी
सरस्वतीचा हात धरोनि
तिला पुजुया उरी
सौभाग्याचे अभंग लेणे जपूया कुंकुम खुणा ॥१॥

वत्सल होता गहिंवर जेथे
स्पर्श प्रभूचा तेथे
होऊनी मुरली घनश्यामाची
गोकूळ नगरी दाटे
तोच फुलांना जागविणारा विश्वाची प्रेरणा ॥२॥

वाळवंटी ही कृष्णकमलिनी
होऊनी मीरा झुरते
ठायी ठायी रूप तयाचे
झाडांमधुनी दिसते
जन्म होऊ द्या नृत्य हरीचे मंगलमय चेतना ॥३॥

**चित्रपट - शपथ तुला बाळाची**

# चंपा चमेली की जाई अबोली

संगीत - अशोक पत्की

गीत - शांता शेळके

अनुराधा - लाऽऽऽललला ऽऽऽऽलाऽऽऽ
चंपा चमेली की जाई अबोली
पहा माझी वहिनी अशी

सहगायिका - नाती मायेची दुध सायीची
नणंद ही माझी अशी
पाठची ग ताई जशी ॥ धृ०॥

अनुराधा - दादाची लाडकी होणार ग
चंद्राची पालखी येणार ग
पुनवेचं चांदणं साथीला साजण
एकांती फिरायला जाशील कशी

सहगायिका - चल हट

अनुराधा - चंपा चमेली की जाई अबोली
पहा माझी वहिनी अशी ॥१॥

सहगायिका - तुझाही सजणा येणार ग
राणीला अलगद नेणार ग

प्रेमात हासणे कुजुबुजु बोलणे
आम्हाला बाई तू पुसणार कशी

अनुराधा - अं ऽ ऽ बघ हं ऽ ऽ ऽ ऽ
चंपा चमेली की जाई अबोली
पहा माझी वहिनी अशी ।।२।।

अनुराधा - नको ग वहिनी चिडवू अशी
सहगायिका - मनात सारी दिसते खुशी
दोघी - नणंद वहिनी जीवाच्या बहिणी
प्रेमाची नाती जुळली अशी
अनुराधा - चंपा चमेली की जाई अबोली
पहा माझी वहिनी अशी
सहगायिका - नाती मायेची दुध सायीची
नणंद ही माझी अशी
पाठची ग ताई जशी ।।३।।

**चित्रपट - नणंद भावजय**

# हरे कृष्णा हरे कान्हा

| संगीत - अरुण पौडवाल | गीत - सुधीर मोघे |
|---|---|

रवींद्र - बोला पुंडलिक वरदे हारी विठ्ठल
श्री ज्ञानदेव तुकाराम, जय श्रीगुरुदेव दत्त.
आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ
हरे कृष्णा हरे कान्हा कृष्णा कृष्णा हरे हरे

कोरस - हरे कृष्णा हरे कान्हा कृष्णा कृष्णा हरे हरे

रवींद्र - हरे कृष्णा हरे कान्हा रे गोविंदा रे मुकुंदा
हे मुरलीचे सूर नेती मजला दूर
हरे कृष्णा हरे कान्हा रे गोविंदा रे मुकुंदा ॥धृ०॥

अनुराधा - कानी आली तुझी हाक
राहिले रे काम धाम
दूर गेले घरदार
नाती गोती माया प्रेम
तुझे प्रेम हेची धाम
तुझे प्रेम हा विश्राम

हरे कृष्णा हरे कान्हा रे गोविंदा रे मुकुंदा
हे मुरलीचे सूर नेती मजला दूर ।।१।।

अनुराधा - तुझे डोळे बघतील
तेच मी ही रे पाहीन
तुझ्या मनातील गाणे
माझ्या ओठांना देईन
ऐल तूच पैल तूच
अंतरीची पटली खूण
अरे कृष्णा अरे कान्हा रे गोविंदा रे मुकंदा
हे मुरलीचे सूर नेती मजला दूर ।।२।।

**चित्रपट - माझे घर माझा संसार**

# पाळणा तुला घननीळा

संगीत - अरुण पौडवाल

गीत - सुधीर मोघे

जो जो रे बाळा जो जो रे तुज जोजविते गोविंदा गोपाळा
पाळणा तुला घननीळा थांबव चाळा नीज गडे लडिवाळा ।।धृ०।।

तूं कौसल्येचा राम देवकीचा नंदन श्याम
तूं परम सुखाचे धाम तूं धाम किती उदरी धरी अंकुरसी देहाला
तुज जोजविते गोविंदा गोपाळा पाळणा तुला घननीळा ।।१।।

रे आमुचे प्रेम अरुप जणू दरवळणारा धूप
तूं समूर्त तयांचे रुप तू रुप तव रुपी मी जपते मीलन वेळा
तुज जोजविते गोविंदा गोपाळा, पाळणा तुला घननीळा ।।२।।

चित्रपट - माझे घर माझा संसार

# तुळजा ऽ ऽ भवानी महिषासुरमर्दिनी

संगीत - सदाशिव गुजर

गीत - अ. बं. कोटो

तुळजा ऽ ऽ भवानी महिषासुरमर्दिनी
आनंद होई मनी मंगलमय दर्शनी ।।धृ०।।

तुझ्या कृपेने पतीत पावन जन सारे होती
धन्य आहे जगी थोर तूं चैतन्य मूर्ती
अमंगलास सुगंध येई तुझ्या आई अंगणी
आनंद होई मनी मंगलमय दर्शनी ।।१।।

मयुरपिसाचा मुगुट शोभे वासुदेवाचे शिरी
चौघड्याचा नाद घुमतो सकल या परिसरी
सडे शिंपिती ललना कुंभी कुंकवाचे पाणी
आनंद होई मनी, मंगलमय दर्शनी ।।२।।

चित्रपट - आई तुळजाभवानी

# फांदीवरले घर कोसळते

संगीत - अनिल -अरूण

गीत - शांताराम नांदगांवकर

फांदीवरले घर कोसळते
फुटता पंख पिलांना
तुला पक्षिणी कुणी न उरते
कुठला लळा जिव्हाळा
तुझ्यासाठी प्राणांचा मी दिवा लाविला
सुखाने तू रहा बाळा आशीर्वाद तुला,
आईचा ।।धृ।।

कुणी सांगे बाळा तू रे
त्रैलोक्याचा स्वामी
अन्नासाठी दारोदारी
फिरे आंधळी मी
दौलतीच्या दिमाखाने
नको होऊ अंध राजा
तुझ्या एका आठवाने गळा दाटला
सुखाने तू रहा बाळा आशीर्वाद तुला,
आईचा ।।१।।

धनांपायी मनाचा ना
कधी तोल ढळावा
कुणाच्याही कुसंगाचा
तुला मोह नसावा
श्रीमंतीच्या डोलाऱ्याचा
गरिबीला शाप ऐसा
आनंदाची फुले यावी तुझ्या वेलीला
सुखाने तू रहा बाळा आशीर्वाद तुला,
आईचा ।।२।।

**चित्रपट - मायबाप**

१३

# कसा म्हमईचा फौजदार

संगीत - विश्वनाथ मोरे

गीत - जगदीश खेबुडकर

कसा नवसानं मला मिळला
जीवाचा जोडीदार
कसा म्हमईचा, कसा म्हमईचा
कसा म्हमईचा फौजदार ।।धृ०।।

लेफ्ट राईट लेफ्ट राईट अबाऊट टर्न

पाचुंदाभर मिशा व्हटावर रुबाब त्याचा न्यारा
नव्या बुटाचा आवाज ऐकून गाव हादरतो सारा
लोक म्हणतील बघून त्याला, कोन ग ह्यो सरदार
कसा म्हमईचा, कसा म्हमईचा,
कसा म्हमईचा फौजदार ।।१।।

चाय लाव ..... हां साब,
खाना लाव ..... जी हुजूर
बैठ जाव ..... हां सरकार

संसाराच्या चौकीमधनं आर्डर सोडल कशी
लाडीगोडीनं मर्जी राखून करीन त्याची खुशी
हौस हौसनं नव्या घराचा सजवीन मी संसार
कसा म्हमईचा कसा म्हमईचा
कसा म्हमईचा फौजदार ॥२॥

चित्रपट - मुंबईचा फौजदार.

१५

# मराठमोळं गाणं

संगीत - विश्वनाथ मोरे

गीत - जगदीश खेबुडकर

कोरस - मिनी मिनी मिनी मिनी मेरी गो राऊंड
अपडाऊन अपडाऊन मेरी गो राऊंड
अनुराधा.- मराठमोळं गाणं शंभर नंबरी सोनं
संगीताच्या गळ्यातलं हे सात सुरांचं लेणं ॥धृ०॥

अनुराधा - गण गौळण कधी पवाडा ऐका
रन हलगीचा मर्द रांगडा ठेका
तरणा भुलतो म्हातारा झुलतो
प्वार डुलतया तान्हं
मराठमोळं गाणं शंभर नंबरी सोनं ॥१॥

अनुराधा - वाजे संबळ सुरात गातोया गोंधळी
कोरस - उधो ग आई उधो, उधो
गोंधळा ये आई गोंधळा ये
आई भवानी गोंधळा ये
अनुराधा - दिमडी वाघ्याची ठेक्यात नाचे मुरळी

कोरस - येळकोट येळकोट जय मल्हार
जेजुरीच्या खंडेराया जागराला या या
हबं ऽ ऽ हाडं, हबं ऽ ऽ हाडं
हबं हबं हबं हबं,. हाडं हाडं हाडं हाडं

अनुराधा - ढोल तमामा धनगर राजा गातोया सुमरान
मराठमोळं गाणं शंभर नंबरी सोनं ।।२।।

कोरस - मिनी मिनी मिनी मिनी मेरी गो राऊंड
अपडाऊन अपडाऊन मेरी गो राऊंड
साऊंड ऑफ म्युझिक हाऊस ऑफ म्युझिक
ऑल दॅट लाईक अॅज हेवन.

**चित्रपट - मुंबईचा फौजदार.**

# ओघ मायेचा हा

संगीत - सुधीर फडके

गीत - सुधीर मोघे

ओघ मायेचा हा कधी थांबू नये
माझ्या सौभाग्याला दृष्ट लागू नये
दृष्ट लागू नये कधी दृष्ट लागू नये ।।धृ०।।

स्वप्नी ये कधी जे ना वांछिले
भासातले सारे कसे सत्य जाहले
सुख आपुले आपण कधी मोजू नये
माझ्या सौभाग्याला दृष्ट लागू नये ।।१।।

मन सुखावले तृप्तीत भिजून
उणे नाही कांही इथे नाही कांही न्यून
दान झेलतां पेलता उतू मातू नये
माझ्या सौभाग्याला दृष्ट लागू नये ।।२।।

चित्रपट - माहेरची माणसं

# मी आले ऽ ऽ ऽ निघा ऽ ऽ ऽ ले

संगीत - अरुण पौडवाल

गीत - शांताराम नांदगांवकर

मी आले ऽ ऽ ऽ ऽ निघाले ऽ ऽ ऽ
मी आले ऽ ऽ ऽ ऽ निघाले ऽ ऽ ऽ
सजले फुलले फुलपाखरु झाले वेग पंखाना आला असा
आल्या या लकेरी घेतली भरारी
तुफाना परी मी बेभान झाले ।।धृ०।।

नील नभातुन विहरत जाऊ लहरत पाण्यावरी
जीवन बघु या रंग मजेचे उधळीत स्वप्नापरी
यौवन म्हणजे गंमत जंमत सुख हे जन्मातले ।।१।।

तोडून टाकू बंध पुराणे जाऊ चला नवतीकडे
फुलपंखानी मारु भरारी झेप घेऊ आता पुढे
आंनदाचे विश्वची आम्ही येथे केले खुले ।।२।।

चित्रपट - गंमत जंमत

# गगनाच्या छायेखाली

संगीत- अशोक पत्की

गीत - शांताराम नांदगांवकर

अनुराध - गगनाच्या छायेखाली, घर ते आपुले छान
सुंदर सुंदर धरणी हसरी
प्रीत वेल ही बहरे दारी
इथे सुखाची दुनिया फुलवू
तू आणि मी ॥धृ०॥

सुरेश - चंद्रमौळी झोपडी खिडकी ही अशी
आरसाही नाही बघशील तूं कशी
अनुराधा - दर्पण सजणा तव ही लोचने
हृदयी ह्या तुझ्या मजला राहणे
जवळ ये मिठीत घे धुंद होऊ या
दोघे - गगनाच्या छायेखाली घर ते आपुले छान ॥१॥

सुरेश - नाते युगायुगांचे आपुले साजणी
अनुराधा - या सुखाच्या डोही न्हालो रंगुनी
सुरेश - तम सरीला आता तेज ये अंतरी

अनुराधा - बघ झाली अशी दिवाळी साजरी
दोघे - तुझ्यात मी, माझ्यात तू , एक होऊ या
दोघे - गगनाच्या छायेखाली घर ते आपुले छान ॥२॥

**चित्रपट - राणीनं डाव जिंकला**

# रंगपंचमी रंगली

संगीत - पांडुरंग दिक्षित

गीत - राम उगावकर

राम प्रहरी भगवंताची रंगपंचमी रंगली
रंगपंचमी रंगली  खेळ रंगाचा मांडिला,
उगवती लाल झाली उगवती लाल झाली ।।धृ०।।

उधळीतो नाना रंग रंग रंगी झाले दंग
सांग माझ्या अंगणात कधी  खेळेल श्रीरंग
सोनियाच्या संसारात तुझ्या कृपेची साऊली ।।१।।

तुम्ही येता नारायणा दाही दिशा उजळती
किरणांच्या लाख ज्योती आभाळात झळकती
माझ्या दारी उजळू दे रे एक पणती चिमुकली  ।।२।।

रामप्रहरी भगवंताची रंगपंचमी रंगली
खेळ रंगाचा मांडिला उगवती लाल झाली

चित्रपट - पायगुण

# अवती भोवती फिरुन दमलं

संगीत - विश्वनाथ मोरे

गीत - अशोकजी परांजपे

अवती भोवती फिरुन दमलं
माझ्या जाळ्यात पाखरु गावलं ।।धृ०।।

आलं शेतावर, बसलं पिकावर
मारी चोच फार भरल्या कणसावर
आता गुमान येऊन बसलं
माझ्या जाळ्यात पाखरुं गावलं ।।१।।

लई गिर्रेबाज, नदर कावेबाज
सावध झालंय आज घेतंय अंदाज
त्याचं पाऊल चुकुन पडलं
माझ्या जाळ्यात पाखरुं गावलं ।।२।।

चित्रपट - दिसतं तसं नसतं

# मनी गुंफीते मी

संगीत - पांडुरंग दिक्षित

गीत - राम उगावकर

मनी गुंफीते मी स्वप्न माला
माला ग
स्वप्नामधल्या राजमहाली
साजन माझा आला ॥धृ०॥

फुलारुन घेई सखा हात हाती
शहारुन लाजे जुई लाजवंती
स्पर्श सुखाचा पहिला वहिला
रोमांचाने नटला नटला ॥१॥

रात रंगली ही पहिली सुखाची
मिठी धुंद झाली जुई मोगऱ्याची
अधरा वरती अधर टेकवुनी
अमृत पिऊनी गेला गेला ॥२॥

चित्रपट - पायगुण

# साद ओली पाखराची

संगीत - श्रीधर फडके

गीत - प्रवीण दवणे

कोरस - आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ
अनुराधा - ओ ऽ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ ऽ
ओलेत्या पानात सोनिया उन्हात भरून मेघ आले
डहाळी जणू नवी नोवरी हळद रंग ओले
कोरस - ओलेत्या पानात सोनिया उन्हात भरून मेघ आले
डहाळी जणू नवी नोवरी हळद रंग ओले
अनुराधा - साद ओली पाखराची ओढ जागे पावसाची
कोरस - साद ओली पाखराची ओढ जागे पावसाची ।।धृ०।।

अनुराधा - डोहाळे या मातेला सूर बोले थेंबातला
वाटा आता कस्तुरी गंध उमले कोबांतला
थरारे मन वारे नवीन सृजन रंग न्हाले
कोरस - ओलेत्या पानात सोनिया उन्हात भरून मेघ आले
डहाळी जणू नवी नोवरी हळद रंग ओले
अनुराधा - साद ओली पाखराची ओढ जागे पावसाची ।।१।।

अनुराधा - स्वप्न लहरे नवे कांचनी धून हरवे रानातूनी
राधिका जाहली बावरी जन्म लहरे मुरलीवरी
तृप्ती निराळी उजळीत डोळी स्वर हे कुठून आले
कोरस - ओलेत्या पानात सोनिया उन्हात भरुन मेघ आले
डहाळी जणू नवी नोवरी हळद रंग ओले
अनुराधा - साद ओली पाखराची ओंढ जागे पावसाची ||२||

कोरस - आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ
अनुराधा - ओ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ
हरपून जाई दिशा ओढाळ साऱ्या कशा
शिणगार करिती ऋतू प्रीत स्पर्शात जाई उतू
अभिसार न्यारा हळवा शहारा हरुपास रुप आले
कोरस - ओलेत्या पानात सोनिया उन्हात भरुन मेघ आले
डहाळी जणू नवी नोवरी हळद रंग ओले
सर्वजणी - साद ओली पाखराची ओढ जागे पावसाची ||३||

**चित्रपट लक्ष्मीबाई भ्रतार वासुदेव**

# भरुन भरुन आभाळ आलंय

संगीत - श्रीधर फडके

गीत - शांता शेळके

अनुराधा - आ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ
भरुन भरुन, भरुन भरुन
भरुन भरुन आभाळ आलंय भरुन भरुन
कोरस - भरुन भरुन आभाळ आलंय भरुन भरुन
अनुराधा - भरल्या वटीनं जडजड झालंय ।।धृ०।।

अनुराधा - शकुनाचा आला वारा माझ्या मनात ओल्या धारा
आला वास ओला मातीचा सोयरा
कोरस - भरुन भरुन आभाळ आलंय भरुन भरुन ।।१।।

कोरस - तुला चिंचा बोरं देऊ कांही देऊ कांही ग
काय मनात कानात सांगून दे तू माझ्या बाई ग
अनुराधा - आ ऽ ऽ ऽ ऽ
पान पानाला सांगून जाई कणी सुखानं भरली बाई
गळूनी फूल आता फळ आलं मोहरा ऽ ऽ ऽ ऽ
कोरस - भरुन भरुन आभाळ आलंय भरुन भरुन ।।२।।

अनुराधा - भर दिसा कशाची चाहूल आली आली बाई ग
जीव उगाच वेडा हसतो पुसतो कांही बाही ग
कोरस - सई साजणी साजणी सई साजणी साजणी
अनुराधा - कशी इकडचं घेऊ नांव माझं गुपित मजला ठावं
तिरक्या पावलांचा झाला ग भोवरा ऽ ऽ ऽ ऽ
कोरस - भरुन भरुन आभाळ आलंय भरुन भरुन ।।३।।

कोरस - बीज रुजून झाली लेकुरवाळी धरती बाई ग
आला रुपाला पान्हा लाजत हसते काळी आई ग
अनुराधा - तटतटाला झोका देई पाणी सळसळ गाणं गाई
हाती काय येई जाई की मोगरा ऽ ऽ ऽ ऽ
कोरस - भरुन भरुन आभाळ आलंय भरुन भरुन ।।४।।

अनुराधा - आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ
टपटप टप टप, टप टप टप टप
कोरस - टप टप टप टप लप पोरी लप घरात लप
जप पोरी जप जिवाला जप
अनुराधा - हा ऽ ऽ राहू आत जाऊ कोणी बाई सावरा ऽ ऽ ऽ ऽ
कोरस - भरुन भरुन आभाळ आलंय भरुन भरुन ।।५।।

**चित्रपट - लक्ष्मीबाई भ्रतार वासुदेव**

# दे टाळी मला

संगीत - राम लक्ष्मण

गीत - शरद निफाडकर

ती - दे टाळी मला
तो - घे टाळी तुला, दे टाळी मला ऽ ऽ
दोघे - तुझी अन माझी प्रीत आगळी
सांगू या जगाला ।।धृ०।।

ती - दे टाळी मला
तो - घे टाळी तुला
ती - ऐक रे साजणा, लाल गाली खुणा
सांग काश्मिरी गुलाब, कां रे फुलतो पुन्हा पुन्हा
तो - ऐक ग साजणी, प्रीतीने लाजूनी
रविराजाला बघुनी रंगते वसुंधरा रानी
नवरंगाने तुषार उधळीत रंगीत प्रीत फुलोरा ।।१।।

ती - कां मनी हूरहूर, हृदयी रे काहूर
तो - मने मनाला मिळता, उठते प्रीतीचे वादळ
ती - मुक्त झाली कळी, भावना मोकळी

तो - डोळ्यामधुनी गुपित बोलते माझी अबोली
दोघे - दोघे घेऊ गगनी भरारी, जाऊ दाही दिशेला ॥२॥
लाला ला ला ला

**चित्रपट - देवता**

# ढोलकीच्या तालावर

संगीत - हृदयनाथ मंगेशकर

गीत - वसंत बापट

ढोलकीच्या तालावर घुंगराच्या बोलावर
मी नाचते मी नाचते इष्काच्या दरबारात ।।धृ०।।

हा मिशीवाला बावरा, बोका जसा
हा चष्मेवाला कावळा, खोका जसा
नुसतं डोळ्यानं खुणवी, फुक्का जसा
मला जिंकाया पावनं हलवा खिसा
मी भाळते मी खेळते, पैशाच्या बाजारात ।।१।।

मी नटरंगी नार लई खट्याळ व्हती नजरेनं पाखरं घायाळ
गडी काळजात बसलाय खुशाल, त्यो इष्काच्या खेळात लई हुशार
मी नाचते मी डोलते इष्काच्या दरबारात ।।२।।

चित्रपट - उंबरठा

# स्वर्ग त्यापुढे फिका पडे

संगीत - अरुण पौडवाल

गीत - सुधीर मोघे

ती - ऊं ऽ ऊं ऽ ऽ ऽ ऊं ऽ ऽ ऽ ऽ
तो - दृष्ट लागण्याजोगे सारे गालबोटही कुठे नसे,
जग दोघाचे असे रचू की स्वर्ग त्यापुढे फिका पडे

ती - दृष्ट लागण्याजोगे सारे
गालबोटही कुठे नसे
जग दोघांचे असे रचु की
स्वर्ग त्यापुढे फिका पडे ।।धृ०।।

तो - स्वप्नाहून सुंदर घर ते
मनाहून असेल मोठे
ती - दोघांनाही जे जे हवे ते
होईल साकार येथे
तो - आनंदाची अन् तृप्तीची
शांत साऊली इथे मिळे
जग दोघांचे असे रचु की
दोघे - स्वर्ग त्यापुढे फिका पडे ।।१।।

ती - जुळले रे नाते अतुट
घडे जन्मजन्मांची भेट
तो - घेऊनिया प्रीतीची आण
एकरुप होतील प्राण
ती - सहवासाचा सुगंध येथे
तो - आणि सुगंधा रुप दिसे
ती - जग दोघांचे असे रचु की
दोघे - स्वर्ग त्यापुढे फिका पडे ॥२॥

चित्रपट - माझे घर माझा संसार

# गुरूविण नाही दुजा आधार

| संगीत | गीत - |
|---|---|

ती - गुरूविण नाही दुजा आधार
रडता पडता कोठे अडता
तोच नेतसे पार ऽ ऽ ऽ
गुरूविण नाही दुजा आधार ।।धृ।।

कोरस - जय गुरूदेव श्री गुरूदेव
ती - गुरू परमेश्वर गुरू माऊली
सदा कृपेची देई साऊली
भक्तांसाठी गुरू होऊनी
देव घेई अवतार ऽ ऽ ऽ ।।१।।

कोरस - जय गुरूदेव जय गुरूदेव
ती - वंदन पूजन करतां भावे
प्रसन्न होते गुरू माऊली
सुख दे अपरंपार ऽ ऽ ऽ
गुरूविण नाही दुजा आधार ।।२।।

तो - शरण तुम्हाला आम्ही प्रभूवर
जगा दिसू द्या तुमचे अंतर
या मायेतून सत्य रूप तव
होऊ द्या साकार ऽ ऽ ऽ
गुरूविण नाही दुजा आधार ॥३॥

**चित्रपट -**

# हा सागरी किनारा

संगीत- विश्वनाथ मोरे

गीत- जगदीश खेबुडकर

तो- हा सागरी किनारा, ओला सुगंध वारा
ओल्या मिठीत आहे हा रेशमी निवारा
ती- ओ ऽ ऽ ऽ ओऽ ऽ ऽ
हा सागरी किनारा ओला सुगंध वारा
ओल्या मिठीत येतो अंगावरी शहारा
हा सागरी किनारा.....।।धृ०।।
ती- मी कालचीच भोळी मी आज तीच येडी
ही प्रीत येगळी का न्यारीच आज गोडी
का भूल ही पडावी, वळखून घे इशारा
ओल्या मिठीत येतो अंगावरी शहारा
तो- हा सागरी किनारा.....।।१।।
तो- होते अजाणता मी ते छेडिले तराणे
स्वीकारल्या सुरांचे आले जुळून गाणे
हा रोम रोम गाई, गातो निसर्ग सारा
ओल्या मिठीत आहे हा रेशमी निवारा
दोघे- हा सागरी किनारा.....।।२।।

चित्रपट - मुंबईचा फौजदार

# झाली फुले कळ्यांची

संगीत- अनिल अरूण

गीत - जगदीश खेबुडकर

शेर-
झाली फुले कळ्यांची पाहुनी दिलवराला
तालांत पावलांच्या चढली नशा सुराला
ही पैंजणे सुरात सजली तुझ्याचसाठी
ही धुंद रातराणी फुलली तुझ्याचसाठी ।।धृ०।।

सलतो उरी फुलोरा, साहु कशी प्रिया मी
हा बहर यौवनाचा, वाहू कशी प्रिया मी
हे बंध रेशमाचे विणले तुझ्याचसाठी ।।१।।

मी आवरु कशी रे बेबंद या कुडीला
वाटे हवा हवासा एकांत या घडीला
घे ताल सोडला मी, राया तुझ्याचसाठी ।।२।।

चित्रपट - नांव मोठं लक्षण खोटं

# कथा सावित्रीची ग ऐकावी

संगीत - प्रभाकर जोग

गीत - शांता शेळके

कथा सावित्रीची ग ऐकावी अन पावन व्हावे बाई
अशी एका सतीची थोर पुण्याई, सतीची पुण्याई ।।धृ०।।
पती अल्पायुषी ग वरिला तिनं, निर्धार तिचा असा
सत्यवाना संगती वनवासाचा, घेतला तिनं वसा
लेक राजाची होती लाडाची, तरी वनांत सुखानं राही ।।१।।
क्षण निर्वाणीचा ये, प्राण पतीचा घेऊन काळ निघे
यम चालला पुढे सावित्री सती चालते मागे मागे
नाही मनात शंका भीती तिचा निर्धार अढळ राही ।।२।।
पैज यमाशी सती लाविते, असं सर्वस्व लावी पणा
यम धर्म ही आला शरण तिला पाझर फुटे मना
म्हणे लेक तू माझी धर्माची, बाई सौभाग्य आपुले घेई ।।३।।
सात पावला संगे जन्मोजन्मीचे अखंड नाते जडे
तेज कुंकवाला ग लाल रक्ताचे अक्षय हाती चुडे
सुखदु:खात, त्याग भोगांत, दोन जिवांची एकता राही ।।४।।

चित्रपट - सतीची पुण्याई

# वारा आला भेटायला

संगीत-अशोक पत्की

गीत - शांताराम नांदगांवकर

वारा आला भेटायला प्रीतीचं गोड गुज सांगायला
चल जाऊया गीत गाऊया धुंद वेळी अशा ॥धृ०॥

लाल लाल गालाला झालय काय
कानांत सांगू का सोपा उपाय
गोड तुझ्या बोलानं प्रितीच्या मोलानं
सख्या वेली अशा वेडावल्या..... धुंद वेळी अशा.....॥१॥

राया तुझ्या प्रेमाचा गुलाब लाल
तुझा हात माझ्या तूं हातात घाल
ओढ तुझी लागून, आले तुझ्या मागून
चल जवळ येना अशी लाजू नको धुंद वेळी अशा .....॥२॥

चित्रपट - नणंद भावजय

# सर्व दारे बंद झाली

संगीत - नागेशराज

गीत - विनायक रहातेकर

सर्व दारे बंद झाली सर्व आशा संपली
म्हणून आले दारी तुझीया हाय फसगत जाहली
राऊळी मी रोज येऊन नाही तुजला जाणीले
दु:ख हे सलते जिवाला देव दगडा मानिले..... ।।धृ ०।।
भक्तिच्या मी कल्पतरुचे रोप दारी लाविले
वाढविता दिवस रात्री देहभाना विसरले
त्या तरुला फळ विषारी अवकृपेचे लागले
दु:ख हे सलते जिवाला देव दगडा मानिले ..... ।।१।।
द्रौपदी-सीता सतीच्या रक्षणाला धावला
पाठीराखा पाठमोरा तोच मज तू जाहला
भक्त संकटी तारण्याचे ब्रीद कां तू मोडीले
दु:ख हे सलते जिवाला देव दगडा मानिले.... ।। २ ।।
उधळला संसार, मांडून तू मला जिवदान दे
घे तुझी इच्छाच असली घे कठोरा प्राण घे
तार किंवा मार मजला सत्व दावी आपुले
दु:ख हे सलते जिवाला देव दगडा मानिले..... ।।३।।

चित्रपट - शरण तुला भगवंता

# अश्विनी ये ना

संगीत - अरुण पौडवाल

गीत - शांताराम नांदगांवकर

तो - अश्विनी ये ना ये ना
प्रिये, जगु कसा, तुझ्या विना मी राणी ग
कशी ही जिंदगीत आणीबाणी ग, ये ना प्रिये
मी तर प्रेम दिवाना रसिला दे प्यार जरासा नसीला....

ती - प्रिया, उगाच संशयात मी बुडाले रे
तुला छळून मी जळून गेले रे, ये साजणा
विसर झाले गेले सख्या रे, शरण आले राया तुला रे

तो - मंद धुंद ही गुलाबी हवा

ती - हो अं अं

तो - प्रित गंध हा शराबी नवा

ती - ल ल ल्ला

तो - हात हा तुझ्याच हाती हवा

ती - ल ल ल्ला

ती - झोंबतो तनुस हा गारवा

तो - तुझी माझी प्रिती अशी फुले मधुराणी

ती - फुलातुनी उमलती जशी गोड गाणी

तो - ये ना तू ये ना
ती - ना ना ना
तो - ये अशी मिठीत ये साजणी
ती - पा पा
तो - पावसात प्रितीच्या न्हाऊनी
ती - ल ल ल्ला
ती - स्वप्न आज राहिले लोचनी
तो - ला ला ल्ला
ती - अंग अंग मोहरे लाजूनी
तो - जाऊ नको दूर आता मन फुलवूनी
ती - तूच माझा राजा अन् मीच तूझी राणी

**चित्रपट - गंमत जंमत**

# ही नवरी असली

संगीत- अनिल अरूण

गीत - शांताराम नांदगांवकर

सचिन - ही नवरी असली, अरे ही मनांत ठसली.....२
तिचा नखरा पाहून काळीज उडतंय.....
हो ऽ ऽ हो ऽ ऽ हो ऽ ऽ धक् धक् धक्.....

अनुराधा - हा नवरा असला, अरे हा कोपऱ्यात बसला २
मला येता जाता चोरुन बघतोय
हो हो हो हो टकमक टकमक.....॥धृ०॥

सचिन - मनातलं सारं सांगून गेली
अशी जिरवली खोडी .....२

अनुराधा - सपनात आता रंगून जाईल
दो हंसो की जोडी.....२

सचिन - ही पोरगी पटली

अनुराधा - हो नवरी नटली

सचिन - पोर शालू नेसून चमकत जाईल

अनुराधा - हो हो हो हो - लख लख लख लख ॥१॥

अनुराधा - लगीन झाल्यावर दावीन इंगा
समजू नको मला भोळी

सचिन - कजाग बायको झालीस तर मी
देईन फुटाची गोळी

अनुराधा - मी हुकुमाची राणी

सचिन - तुला मी पाजीन पाणी

अनुराधा - आता तांडव सोडून मांडव घालू ये ऽ ऽ

सचिन - लगबग

अनुराधा - लगबग

दोघे - ही नवरी असली हो हो हो ॥२॥

**चित्रपट - नवरी मिळे नवऱ्याला**

# माझ्या मातीचे गायन

संगीत - श्रीधर फडके

गीत - कुसुमाग्रज

माझ्या मातीचे गायन
तुझ्या आकाश श्रुतींनी
जरा कानोसा देऊन
कधी ऐकशील कां रे ?
माझ्या मातीचे गायन ॥धृ०॥

माझी धुळीतील चित्रे
तुझ्या प्रकाश नेत्रांनी
जरा पापणी खोलून
कधी पाहशील कां रे ?
कधी ऐकशील कां रे ?
माझ्या मातीचे गायन ॥१॥

माझ्या जहाजाचे पंख
मध्यारात्रीत माखले
तुझ्या किनाऱ्यास दिवा

कधी लावशील कां रे ?
माझ्या मातीचे गायन ॥२॥

माझा रांगडा अंधार
मेघा मेघात सांचला
तुझ्या उषेच्या पानी
कधी टिपशील कां रे ?
कधी ऐकशील कां रे ?
माझ्या मातीचे गायन ॥३॥

**चित्रपट - लक्ष्मीबाई भ्रतार वासुदेव**

# मी जलवंती मी फुलवंती

संगीत - ऋषीराज

गीत - मुरलीधर गोडे

ती - मी जलवंती मी फुलवंती
तुझी नजर लागलं मला
तो - काय तुझ्या मनात
सांग माझ्या कानांत
जाई-जुईच्या फुलां रं
तो - थांब जरा तिथं
ती - ऊं, लाज वाटती
तो - काय म्हणू तिला
ती - ती हाय पिरती मी जलवंती ।।धृ०।।

ती - या पावसांत झाले ओलेचिंब
गोऱ्या गाली मोतीयाचे थेंब,
दोघात निवांत मिळाला एकांत
भेटीचा मोका आला . .
मी जलवंती . . . . ।। १ ।।

तो - तुझ्या रुपाचं रुपाचं
डोळ्यात हासु फुटे
ती - तुझ्या संगतीनं संगतीनं
उमलून पाकळी मिटे
तो - रुसावं हसावं, उगीच फसावं
कुठ ही शिकलीस कला
ती - तुझी नजर लागल मला ॥ २ ॥

चित्रपट - बन्या बापू

# विश्व जोवरी चालेल

संगीत - अनिल अरूण

गीत - सुधीर मोघे

विश्व जोवरी चालेल रामायण ही राहील,
चंद्र सूर्य ही येतील जातील खेळ पुराणा बघतील ॥ धृ०॥

बंधु जनांची अजोड भक्ती मनामनांच्या रेशीम गाठी
प्रत्येकाच्या मनी मानसी रामजानकी वसतील ॥१॥

कलीं कुणाच्या हृदयी शिरता
तुटतील धागे बघतां बघतां
ऋणानुबंधावर जणु तप्त निखारे ठेवील ॥२॥

घात कुणाचा करेल कोणी
रक्षण कर्ता होईल कोणी
अवघड वेळी सगे सोयरे परस्परांना जपतील ॥३॥

चित्रपट - सगे सोयरे

# राजा ललकारी अशी

संगीत - अनिल अरूण

गीत- जगदीश खेबुडकर

ती - राजा ललकारी अशी दे
हाक दिली साद मला दे
तो - ओ ऽ हो ऽ ओ ऽ हो ऽ ओ ऽ हो ऽ ऽ ऽ ।।धृ०।।

ती - कुंकवाचा माझा धनी, बळ वाघाचं आलंया
तो - भरलेल्या मोटंवानी मन भरुन गेलंया
ती - ओढ फुलाला वाऱ्याची, जशी साद खुण इशाऱ्याची
माझ्या सजनाला कळू दे हाक दिली साद मला दे ।। १।।

तो - हो ऽ ऽ सुर भेटला सुराला - गानं आलं तालावर
ती - खुळ्या आनंदाचं माझ्या - हासूं तुझ्या गालावर
ती - भरजरीचा हिरवा ; शेला पांघरुन नवा २
शिवार हे सारं खुलू दे हाक दिली साद मला दे ।। २ ।।

ती - थेंब नव्हं हे घामाचं त्याचं बनतील मोती
तो - घास देईन सुखाचा, लई मायाळू ही माती

ती - न्याहरीच्या वखुताचा, घडीभर विसाव्याला [२]
दोघे - सावली ही संग मिळू दे ..... हाक दिली ..... ॥ ३ ॥

राजा लल्कारी अशी घे .....
हाक दिली साद मला दे .....

**चित्रपट - अरे संसार संसार**

# काळ्या मातीत मातीत

संगीत - अनिल अरूण

गीत - प्रा. विठ्ठल वाघ

ती - काळ्या मातीत मातीत तिफन चालते,
तिफन चालते, तिफंन चालते
तो - इज थयथय नाचते, ढग ढोल वाजवितो
ढोल वाजवितो ढोल वाजवितो
ती - काळ्या मातीत मातीत तिफन चालते ॥धृ०॥

ती - सदाशिव हाकारतो नंदी बैलाच्या जोडीला
संगती पारवती चाले ओटी बांधून पाठीला
तो - सरीवर सरी येती माती न्हाती धुती होती
कस्तुरीच्या सुवासानं भूल जिवाला पडली
ती - भूल जिवाला पडते वाट राघूची पाहते
तो - राघू तिफन हानतो मैना वाटुली पाहते
ती - काळ्या मातीत मातीत तिफन वरलते ॥१॥

तो - सर्जा रं माझ्या ढवळ्या रं
माझ्या पवळ्या रं माझ्या हा ऽ हाऽ

ती - झोळी झाडाला टांगुन राबराबते माऊली
तिथे झोळीतील जीवा व्हते पारखी साऊली
तो - अभिषेकांत घामाच्या आज देवाचं पुजन
पिकं हालती डोलती जनू करती भजन
ती - गव्हा जोंधळ्यात तवा सोने चांदी लकाकते
कशी चांदी लकाकते ही कपाशी फुलते
ती - काळ्या मातीत मातीत तिफन चालते ॥ २ ॥

तो - चालू उनपावसाचा, पाठशिवणीचा खेळ
लोनी पायाला वाटती, मऊ भिजली ढेकळं
ती - काळ्या ढेकळांत डोळा, हिरवं सपान पाहतो
डोळा सपानं पाहतो, काटा पायांत रुततो
तो - काटा पायात रुततो, लाल रगात सांडतं
लाल रगात सांडतं, हिरवं सपान फुलतं
ती - काळ्या मातीत मातीत तिफन चालते ॥ ३ ॥

**चित्रपट - अरे संसार संसार**

# गुरुने दिला ज्ञानरुपी वसा

संगीत - प्रभाकर जोग

गीत - जगदीश खेबुडकर

दोघे - गुरूने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा ॥ धृ॥

कोरस - गुरूने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा आ ऽ ऽ ऽ ऽ

तो - पिता बंधु स्नेही तुम्ही माऊली

ती - तुम्ही कल्पवृक्षातळी साऊली

कोरस - पिता बंधु स्नेही तुम्ही माऊली
तुम्ही कल्पवृक्षातळी साऊली आ ऽ ऽ ऽ ऽ

तो - तुम्ही सूर्य, आम्हा दिला कवडसा ॥ १ ॥

कोरस - आम्ही चालवू हा पुढे वारसा
आ ऽ ऽ ऽ ऽ

ती - जिथे काल अंकूर बीजातले

तो - तिथे आज वेलीवरी ही फुले

कोरस - जिथे काल अंकूर बीजातले
तिथे आज वेलीवरी ही फुले

ती - फलद्रूप हा वृक्ष झाला तसा ॥२॥

कोरस - आम्ही चालवू हा पुढे वारसा
आ ऽ ऽ ऽ ऽ
तो - शिकू धीरता, शूरता, विरता,
ती - धरु थोर विद्येसवे नम्रता
तो - मनी ध्यास हा एक लागो असा ।।३।।
कोरस - आम्ही चालवू हा पुढे वारसा
तो - जरी दुष्ट कोणी करु शासन
ती - गुणी सज्जनांचे करु पालन
कोरस - जरी दुष्ट कोणी करु शासन
गुणी सज्जनांचे करु पालन
तो - मनी मानसी हाच आहे ठसा ।।४।।
कोरस - आम्ही चालवू हा पुढे वारसा
दोघे - तुझी त्याग सेवा फळा ये अशी
तुझी कीर्ती राहील दाही दिशा
दोघे - अगा पुण्यवंता भल्या माणसा ।। ५ ।।
कोरस - आम्ही चालवू हा पुढे वारसा
गुरूने दिला ज्ञानरूपी वसा
आम्ही चालवू हा पुढे वारसा

**चित्रपट - कैवारी**

# मला असला नवरा नको

संगीत - राम कदम

गीत - जगदीश खेबुडकर

कोरस - मनासारखा निवडून घ्यावा
जोडीदार कसला हवा
असला, असला की असला ?

अनुराधा - मला असला नवरा नको
यार मला असला नवरा नको नको

कोरस - मग कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
असला, असला की असला ? ।।धृ०।।

अनुराधा - हा लाखाचा धनी जरी गं
जळतो अत्तर दिवा
बंगला गाडी सारे असुनी
हुंडा याला हवा

कोरस - हुंडा नाही वरदक्षिणा

अनुराधा - वरदक्षिणा ? अरे यार !
कसले नांव हे हुंड्याचे
पांघरुण हे ढोंगाचे

हुंडा देऊन विकतचा नवरा
भाडोत्री आसरा नको नको ॥ १ ॥

कोरस - मग कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
असला, असला, की असला ?
अनुराधा - हा तर दिसतो पक्का गुंडा
करतो दादागिरी
इंग्लिश दारु पितो पाजतो
वरती स्मगलिंग करी
कोरस - स्मगलिंग नाही, इम्पोर्ट एक्स्पोर्ट
अनुराधा - इम्पोर्ट एक्स्पोर्ट ? अरे यार
सभ्यपणाच्या नावाखाली
काळा पैसा करणे चाले
तो पापाचा पैसा सारा
काळा खतरा नको नको ॥ २ ॥

कोरस - मग कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
असला, असला, की असला ?

अनुराधा - हा तर दिसतो खुशाल चेंडू
चिकणा चिकणा कसा
खाना पिना मजा करना
आहे मवाली जसा ..... २

कोरस - मवाली नाही जॉली

अनुराधा - जॉली ? अरे यार
वाढवून झिंज्या हिप्पी सारखा
फॅशन उसनी करी
कडकी असुन लडकी मागे
लोफर कुत्रा नको नको

कोरस - मग कसला नवरा हवा
यार तुला कसला नवरा हवा हवा
असला, असला, की असला ?

**चित्रपट - असला नवरा नको ग बाई**

# उठ मुकुंदा उठ श्रीधरा

संगीत - अनिल अरूण

गीत - शांता शेळके

सा ऽ ध ऽ ऽ ऽ सा ऽ ऽ ऽ ध ऽ ऽ प ऽ
पधग सा रे ध सा
उठ मुकुंदा ऽ ऽ उठ श्रीधरा
निशांत बघ जाहला
प्राचीवरती शतरंगातून
रविराज उगवला
आली माझ्या घरी ही दिवाळी
सप्तरंगात न्हाऊन आली ।।धृ०।।

मंद चांदणे धुंद श्वास हा
मी तर त्यात भिजावे
जन्म जन्म रे तुझ्या संगती
एकरुप मी व्हावे
प्रीत नयनी वसे, लाज गाली हसे
आ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ

कोर चंद्राची फुलते भाळी ॥ १ ॥
पाऊल पडता घरी मुकुंदा
गोकुळ हरखून गेले
उटी लाविता अंगी देवा
सुगंध बरसत आले
हर्ष दाटे उरी, नाथ आले घरी
आ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ
सूर उधळीत आली भूपाळी ॥२॥

नक्षत्रांचा साज लेवूनी
रात्र अंगणी आली
दीप उजळले नयनी माझ्या
ती तर दीपावली
सांज होता हरी जाहले बावरी
आ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ
मी अभिसारिका ही निराळी ॥ ३ ॥

**चित्रपट - अष्टविनायक**

# जिथे प्रीत आहे

संगीत - प्रभाकर जोग

गीत - मधुसूदन कालेलकर

आ ऽ ऽ ऽ ऽ

तो - जिथे प्रीत आहे तिथे ज्योत आहे

कोरस - वा ऽ ऽ मार डाला

ती - जिथे प्रीत आहे तिथे ज्योत आहे

कोरस - वा ऽ ऽ ऽ ऽ

तो - आ ऽ ऽ ऽ

प्रीतीविण जगणे फोल प्रीतीपुढे कशाचे मोल

कोरस - वा ऽ ऽ वा ऽ ऽ वा ऽ ऽ

प्रीतीपुढे कशाचे मोल ||धृ०||

दोघे - प्रीतीविण जगणे फोल

प्रीतीपुढे कशाचे मोल

तो - ही शोधुनिया सखी लाजेल कां

ती - लपवून कधी ही लपणार कां

जन्मांतरी हे सौभाग्य मिळे

दैवाचे बोल अमोल

दोघे - प्रीतीपुढे कशाचे मोल ||१||

ती - प्रीतीत धरेशी स्वर्ग झुके
तो - प्रीतीविण सारे रंग फिके
प्रीती फुलवी प्रीती शिकवी
जगण्याची जाण सखोल
दोघे - प्रीतीपुढे कशाचे मोल ।।२।।

तो - प्रीतीस कुणाचा बंध नसे
कोरस - वा ऽ ऽ ऽ मिलिंद क्या बात हैं
ती - प्रीतीस नसे शंका भीती
कोरस - वा ऽ ऽ ऽ बहोत अच्छे रेखा
ती - प्रीतीत असे केवळ प्रीती
कोरस - बरोबर आहे बरोबर आहे
ती - प्रीती व्योमी
दोघे - प्रीती व्योमी अंतर्यामी
प्रीती विश्वाचा तोल
प्रीतीपुढे कशाचे मोल ।।३।।

**चित्रपट - चांदणे शिंपीत जा**

# भाग्य उजळले या जन्माचे

संगीत - सुधीर फडके

गीत - सुधीर मोघे

भाग्य उजळले या जन्माचे धुंद होऊनी तन मन नाचे
स्वर्ग लाभला मला राजसा राजसा जीव तुला वाहिला ।।धृ०।।

स्वप्न माझे मूर्त झाले सूर सारे जुळूनी आले
आ ऽ ऽ ऽ
रोमरोमी गीत नटले भोवतीचे भान नुरले
मनी वसंत फुलूनी आला आला ऽ ऽ आला ऽ ऽ ।।१।।

भूल तुझी जादू भरी आस पास झंकारली
भाषेविण प्रीती कथा आज कशी साकारली
फुलांना गंध आला सुखाला रंग आला
भरुनी ऊर आला खुशीला पूर आला
राजसा रा ऽ ऽ ऽ जसा राजसा ।।२।।

चित्रपट - चोराच्या मनात चांदणं

# सखा अंगाशी माझ्या

संगीत - सुधीर फडके

गीत - वंदना विटणकर

आ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ
सखा अंगाशी माझ्या झटला गं
माझ्या नथनीचा मोती तुटला गं ।।धृ०।।

कशी रायाने केली बाई करणी त्याच्या वेडाने झुरते मी हरिणी
रात दिसाला येते कुशीला ओ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ
त्याच्या इष्काचा तीर मनी रुतला गं ।।१।।

बाई नथनीनं जादु अशी केली त्याच्या मर्जीची बरसात झाली
सादाने तिला त्याच रातीला ओ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ
चांद पिरतीचा मिठीत मिटला गं ।।२।।

चित्रपट - बिनकामाचा नवरा

# हे गर्द निळे मेघ

संगीत - ऋषीराज

गीत - मुरलीधर गोडे

आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ

ती - हे गर्द निळे मेघ बिलगून कधी वीज
मन आज दिवाणे ग

तो - तारांत असे जाग धरणीस नसे नीज
हळू बोल सखे तु गं

ती - हे गर्द निळे मेघ ।।धृ०।।

तो - घे शाल मिठीची ही बिलगून अशी राही
तो - चोर खुणांनी का हसतात दिशा या गं ।।१।।

ती - मी होऊनिया मुरली रे आले तुझ्या जवळी
तो - हे ओठ मुरारीचे किती काळ उपाशी गं ।।२।।

चित्रपट - बन्या बापू

# घेऊन जाशी तूच

संगीत - प्रभाकर जोग

गीत - सुधीर मोघे

घेऊन जाशी तूच दिलेले सौभाग्याचे दान
माधवा कुठे गुंतले ध्यान ।।धृ।।

तूच बांधिल्या मंगल गाठी घर गंगेच्या पावन काठी
विसरलास कां तूच दिलेले मंगलमय वरदान ।।१।।

माधवा ऽ ऽ ऽ मा ऽ ऽ धवा
ही कसली रे तुझी परिक्षा अपराधाविण देशी शिक्षा
मनोमनी मी जपले देवा एक सतीचे गान ।।२।।

माधवा कुठे गुंतले ध्यान
माधवा ऽ ऽ ऽ मा ऽ ऽ धवा

चित्रपट - चांदणे शिंपीत जा

# घडून जे गेले ते

संगीत - प्रभाकर जोग

गीत - सुधीर मोघे

घडून जे गेले ते घडेल का ऽ ऽ फिरुनि ≡ते
कसे पुन्हा उमलावे सुकलेले नाते ।।धृ० ।

कशा जुळाव्या रेशमी गाठी
कशा मिळाव्या चांदण्या राती
हो ऽ ऽ ऽ
कशा जुळाव्या रेशीम गाठी
दुरावले सुख जे ते ।।१।।

क्षणी रुसणे क्षणी झुरणे
क्षणामधे हसणे
मनोगतांचे बोल ते कांही
न बोलता हृदयी जे
स्वर वीणा गाते ।।२।।

चित्रपट - चांदणे शिंपीत जा

# बाळा तुझ्याच साठी

संगीत - अशोक पत्की

गीत - वंदना विटणकर

आ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ
बाळा तुझ्याच साठी
ममता भुकी माऊलीची
साहु कशी वेदना रे
या अंतरीची, या अंतरीची ।।धृ०।।

वणवा जळे भोवताली
नाही कुणीच वाली
माया तुला साद घाली
पाजू कुणाला पान्हा उरीचा
शिक्षा मला ही कशाची ।।१।।

जवळी असुनी दुरावा
का शाप मजला मिळाला
शोधु कुठे मी विसावा
लाभो तुला रे सुख भाग्य सारे
ही आस माझ्या मनीची ।। २ ।।

तान्ह्यास का दूर नेता
का प्राण हिसकून घेता
बाळाविना जन्म खोटा
फोडुन टाहो सांगे जगाला
आई अभागी कधीची ॥३॥

आ ऽ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऽ
बाळा तुला जोजविते
हळुवार अंगाई गाते
हृदयात घेता तुज लाडक्या रे
बरसात होई सुखाची ॥ ४ ॥

**चित्रपट - अर्धांगी**

# आज बाई लाजते मी

संगीत - प्रभाकर जोग

गीत - जगदीश खेबुडकर

ओ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ ऊं
आज बाई लाजते मी
नाचते ही भावना
या वनी या अंगणी
आनंद आला पाहुणा ॥धृ०॥

या कळीचे पाकळीचे
रंग ल्याले आज मी
गंध हा धुंदीत न्हाला
दंग झाले आज मी
थेंब हे दवबिंदू हे
मोत्यापरी ही कल्पना ॥१॥

संथ पाणी गोड गाणी
सूर माझा लाविती
पाऊले चाहूल घेता

वाट माझी दाविती
स्वप्न हे जागेपणी
आभास वाटे देखणा ॥२॥

रूंजतो हा गुंजतो हा
आज भुंगा सावळा
लोचने आतुर झाली
छंद लागे आगळा
बोलत कानी कुणी
येईल आता साजणा ॥३॥

## चित्रपट-दरोडेखोर

# इथं जाळं कोण रे

संगीत - अशोक पत्की

गीत - शांताराम नांदगांवकर

इथं जाळं कोण रे मछली कोण ?
हरविल कोण कोणा जिंकेल कोण?
सांग सावज कोण ? शिकारी कोण ? ।।धृ०।।

तुझी माझी प्रीत राजा शराबी
जरा खोडी जरा गोडी गुलाबी
काट्यामधी जसं फूल गुलाबी
तुझी माझी प्रीत राजा शराबी
दोघांनाही नशा आली दोघेजण झिंगलो रे, कोण ? ।।१।।

ह ऽ ऽ ऽ ऽ ऽ ह ऽ ऽ ऽ ऽ ऽ
कोडे आपुले शेवटी उलगडे
जे जे शोधिले प्रीतीला सापडे निवाड्याची वेळ आली
सुटेल नी गुंतेल रे, कोण फाटेल आणि तुटेल रे, कोण
दोघेजण झिंगलो रे, कोण सुटेल कि गुंतेल रे, कोण ।।२।।

चित्रपट - गोष्ट धमाल नाम्याची

# तुळशी माते तुला

संगीत - सुरेश कुमार

गीत - शांताराम नांदगांवकर

अनुराधा - तुळशी माते तुला पूजिते
करिते तव मी ध्यान
आ ऽ ऽ ऽ
करिते तव मी ध्यान
दे मज तू वरदान ॥धृ०॥

देह झिजावा चंदनापरी
सदैव माझा मम संसारी
भाग्य न दुसरे या सम आई
आस एक ही असे अंतरी
गृहलक्ष्मी मी या संसारी
अन्य नको सन्मान ॥ १ ॥

वासुदेव - रामाच्या, पारामंदी दान पावलं दान पावलं
वासुदेव आला हो वासुदेव आला
अनुराधा - भिक्षांदेही म्हणता याचक

भरूनी ओंजळ दान देऊ दे
येता दारी दीन भुकेला
दोन घास मज, त्यास घालू दे
तुझ्या कृपेने घरदारी या
पडो न कांही वाण ॥२॥

दृष्ट न लागो संसाराला
राजधानी ही माझे घरकुल
सासु सासरे मायबाप हे
नणंद माझी तशीच प्रेमळ
पतिचरणाशी सुवासिनीचे
मंगल तीर्थस्नान ॥३॥

**चित्रपट - घरचा भेदी**

# डोंगर झाडी तालावरती

संगीत - विश्वनाथ मोरे

गीत - जगदीश खेबुडकर

ओ ऽऽऽऽ ओ ऽऽऽऽऽ
अनुराधा - डोंगर झाडी तालावरती
झुलती माझ्यासंगे
खट्याळ वारे रानपाखरे
पळती माझ्यासंगे ए ऽ ऽ बघना
निसर्ग राजा निसर्ग राणी
करिती हा शृंगार
दोघे लुटू या रंगबहार
हिरवेपणात न्यारी खुमार
सजणा ऽ ऽ रे सजणा ..... २
दोघ लुटू या रंगबहार ।।धृ०।।

अनुराधा - मस्त तारूण्य हे राजा झोकून दे
राजा झोकून दे
कसा गंभीर तूं बुरखा फेकून दे
बुरखा फेकून दे

तुझा माझ्यावरी अधिकार
सजणा ऽ ऽ रे सजणा
दोघे लुटूया रंग बहार ॥ १ ॥

सुरेश - असा एकांत हा नको रूसवा धरू
नको नको प्रिये राग फसवा धरू
राग फसवा धरू
आज थोडा करू अविचाार
सजणा ऽ ऽ ऽ रे सजणा
दोघे लुटुया रंगबहार ॥२॥

अनुराधा - आज बंधन नको होऊ बेधुंद रे
होऊ बेधुंद रे
नाचू गाऊ फिरू लुटु आनंद रे
लुटु आनंद रे
आली नशा मला अनिवार
सजणा ऽ ऽ ऽ रे सजणा
दोघे - दोघं लुटुया रंगबहार
हिरवेपणात न्यारी खुमार
सजणा ऽ ऽ रे सजणा ॥ ३ ॥

**चित्रपट - गोंधळात गोंधळ**

# ये अबोली लाज गाली

संगीत - अशोक पत्की

गीत - शांता शेळके

ती - ये अबोली लाज गाली रंग माझा वेगळा
तो - ऐक राणी गुज कानी हा सुखाचा सोहळा ।।धृ।।

तो - मी दिले कांही तुला ग
ती - मी ही आज घेतले
तो - ये कळी पहिली सुखाला
ती - गुपित सांगे आतले
स्वप्न अधरी स्वप्न पदरी
भाव रूजला कोवळा
ये अबोली लाज गाली
रंग माझा वेगळा
तो - ऐक राणी गुज कानी
हा सुखाचा सोहळा ।। १ ।।

ती - ॐ ऽ ऽ ऽ ऽ ॐ ऽ ऽ ऽ ऽ ॐ ऽ ऽ ऽ ऽ
तो - पाकळीच्या पावलांचा गंध गहीऱ्या चाहुली

ती - स्वप्न ये हातात माझ्या
होऊनिया बाहुली
बाहुलीला जोजविता
गीत येते या गळा
ये अबोली लाज गाली
रंग माझा वेगळा
तो - ऐक राणी गूज कानी
हा सुखाचा सोहळा ॥ २ ॥

तो - जे हवे ते सर्व लाभे
ती - काय मागु मी दुजे
तो - चित्र भावी जीवनाचे
ती - बिंब हे माझे तुझे
लागला साऱ्या घराला
हा असा याचा लळा ॥ ३ ॥

**चित्रपट - हेच माझं माहेर**

# घनश्याम सावळा स्मरता

संगीत - प्रभाकर जोग

गीत - जगदीश खेबुडकर

घनश्याम सावळा स्मरता डोळे भरती
हा राग म्हणू की रुसवा माझ्यावरती ।।धृ०।।

कुंजात मोहना, तूं मधु गुंजन केले
लहरीत स्वरांच्या विरघळून मी गेले
कां अमृतधारा, रूप वीषाचे धरती
हा राग म्हणू की रुसवा माझ्यावरती
घनश्याम सावळा ।।१।।

विरहात चांदणे हृदय जाळती माझे
तुजवाचून आता जिणेच झाले ओझे
या भावभावना कणाकणाने झुरती
हा राग म्हणू की रुसवा माझ्यावरती
घनश्याम सावळा ।।२।।

एकांत शून्य हा मीच बंदिनी झाले
हे स्वप्न सुखाचे आसवांत या न्हाले
आभास मनाचे सरले  तरीही उरती
हा राग म्हणू की रुसवा माझ्यावरती
घनश्याम सावळा  ॥ ३ ॥

**चित्रपट - कैवारी**

# डोळ्याला डोळा हातात हात

संगीत - विश्वनाथ मोरे

गीत - जगदीश खेबुडकर

सुरेश - डोळ्याला डोळा हातात हात
नजरेला नजर जडली
सजणी हितच भेट घडली
ग तुझी माझी हितच भेट घडली

अनुराधा - डोळ्याला डोळा हातात हात
पापणीत लाज दडली
सजणा हितच भेट घडली
रे तुझी माझी हितच भेट घडली ।।धृ०।।

सुरेश - तुला बघून भूलली फुलं
घाल केसात गं
हा भुंगा घालील पिंगा
त्या वासात गं
अगं अंगाला अंग
काळजाला काळीज
सुध बुध सारी उडली
हितच भेट घडली ।।१।।

अनुराधा - नको मला गुदगुल्या करू
मी हसू किती
तुझ्यापरी मी खोटं खोटं
सांग रुसु किती
बोटात बोटं गालाला गाल
कसली रे भुल पडली
हितच भेट घडली
अरे तुझी माझी
हितच भेट घडली ॥२॥

सुरेश - आता नवस फेडून आलो
नारी भिऊ नको
अनुराधा - चार चौघात लाडीगोडी
अशी लावू नको
दोघे - अग तुझ्यात मी माझ्यात तूं
कशी नशा चढली ॥३॥

चित्रपट - गोंधळात गोंधळ

# जो जो गाते झोका देते

संगीत - अनिरुद्ध अरूण

गीत - जगदीश खेबुडकर

जो जो गाते झोका देते
नीज नीज लेकरां
ओठात गाणी डोळ्यांत पाणी
सांगु कशी पांखरा ।।धृ०।।

दूर आहे पक्षिणी
चिमण्या पिलाला पारखी
माया ममता बापुडी
ताटातुटीने पोरकी
येऊं कशी मी राहू कशी मी
माझ्या मुक्या पांखरा
जो जो गाते झोका देते
नीज नीज लेकरा ।।१।।

अंधार माझा सोबती
सौभाग्य गेले सोडूनी

आनंद देई हुंदका
घरटे पिलांचे मोडुनी
दाटून आले माझ्या गळा
घेऊ कुठे आसरा
जो जो गाते झोका देते
नीज नीज लेकरा ॥२॥

**चित्रपट - अरे संसार संसार**

# निशाणा तुला दिसला ना

संगीत - अनिल - अरूण

गीत - शांताराम नांदगांवकर

अनुराधा - निशाणा तुला दिसला ना . . . . २
झिरमिर झिरमिर पाऊस धारा
भिरभिर करी मदनाचा वारा
ये ना सजणा ये ना
निशाणा तुला दिसला ना ॥धृ०॥

अनुराधा - भिजली पाने वेली आसमंत हा
अंगी फुलुनी आला रे वसंत हा
प्रीत जली भिजुनि तू ये ना
अलगद मज हृदयासी घे ना
ये ना सजणा ये ना
निशाणा तुला दिसला ना ॥१॥

अनुराधा - हरिणी आली दारी धुंद होऊनी
होना तूच शिकारी डाव टाकुनी
नेम असा धरूनि तू ये ना

सावज हे तू वेधून घे ना
ये ना सजणा ये ना
निशाणा तुला दिसला ना ॥२॥

सुरेश - सावज होई शिकारी जादु पाहुनि
घायाळांची प्रीत आली रंगूनी
नयनांचे तीर मारूं नको ना
निशाणा मला जमला ना
अनुराधा - ये ना सजणा ये ना
सुरेश - निशाणा मला जमला ना ॥३॥

## चित्रपट - नवरी मिळे नवऱ्याला

# घर दोघांचे

संगीत - सुधीर फडके

गीत - सुधीर मोघे

घर दोघांचे, घरकुल पाखरांचे ॥धृ०॥

वाटा कशा निराळ्या जणु एकरुप झाल्या
एका खुळ्या जगात त्याही खुळावलेल्या
जुळले अतूट नाते दोन्ही मना मनाचे .....॥१॥

कधी भांडलोही थोडे थोडे दुरावलोही
पण खूण त्या क्षणाची जपली मनात नाही
रुजले कधी न बीज दोघात संशयाचे .....॥२॥

विश्वास ठेविला मी विश्वास तू दिलास
जपलीस तू मला अन् मी ही तुझ्या मनास
एका क्षणात आपुल्या सुख साठले युगाचे .....॥३॥

चित्रपट - चोराच्या मनात चांदणं

# हे चांदणे फुलांनी

संगीत -प्रभाकर जोग

गीत - मधुसुदन कालेलकर

हे चांदणे फुलांनी शिंपीत रात्र आली
धरती प्रकाश वेडी, ओल्या दंवात न्हाली ।।धृ०।।

तारे निळ्या नभांत हे गुज सांगतात
कां रंग वेगळा हा फुलत्या नव्या कळीस
ओठातल्या स्वराला का जाग आज आली ।।१।।

तो स्पर्श चंदनाचा, की गंध यौवनाचा
उधळीत रंग आला स्वप्नातल्या स्वरांचा
ती रात्र धुंद होती स्वप्नात दंगलेली ।।२।।

चित्रपट - चांदणे शिंपीत जा

# भले बुरे जे घडून गेले

संगीत -

गीत -

भले बुरे जे घडून गेले
विसरुन जाऊ सारे क्षणभर
जरा विसावू या वळणावर,
या वळणावर ।।धृ०।।

कसे कोठूनी येतो आपण
कसे नकळता जातो गुंतून
उगाच हसतो उगाच रुसतो
क्षणात आतुर क्षणात कातर
जरा विसावू या वळणावर
या वळणावर ।।१।।

कधी ऊन्ह तर कधी सावली
कधी चांदणे कधी काहिली
गोड करुनिया हेतु सारे

लावुनिया प्रीतीची झालर
जरा विसावू या वळणावर
या वळणावर ॥२॥

खेळ जुना हा युगायुगांचा
रोज नव्याने खेळायचा
डाव रंगता मनासारखा
कुठली हुरहुर कसले काहूर
जरा विसावू या वळणावर
या वळणावर ॥३॥

**चित्रपट - तुझ्यावाचुन करमेना**

# तुझी माझी जोडी जमली ग

| संगीत - | गीत - |
|---|---|

किशोर - अग हेमा ऽ ऽ ऽ ऽ

अनुराधा - माझ्या प्रेमा ऽ ऽ ऽ ऽ

किशोर - ए ऽ ऽ तुझी माझी जोडी जमली ग
कशी झकास पोरगी पटली
गोरी गोरी कोरी कोरी
इष्काची नोट ही पटली

अनुराधा - लाडीगोडी अशी केलीस तू की
पतंग माझी कटली
निळ्या निळ्या नभात या
दोघांची प्रीती नटली

किशोर - तुझी माझी जोडी जमली ग
कशी झकास पोरगी पटली ॥धृ०॥

अनुराधा - थोडीसी मी लाजाळू
ज्वानी कशी सांभाळू

किशोर - भिती तुला कसली ग
मनात प्रीती वसली ग

तुझी माझी जोडी जमली ग
कशी झकास पोरगी पटली
अनुराधा - लाडीगोडी अशी केलीस तू
पतंग माझी कटली || १ ||

अनुराधा - जाई जुई शेवंती
तशीच मी रे लाजवंती
पाहुनिया तुजला जीव हा फुलला
गंधानं मन हे न्हाले
किशोर - माझी ग तू गुणवंती
मिठीत ये ना फुलवंती
ठुमकत मुरडत जाऊ नको तू
मोहून मन हे गेले
अग हेमा ऽ ऽ ऽ
अनुराधा - माझ्या प्रेमा ऽ ऽ ऽ
किशोर - तुझी माझी जोडी जमली ग
कशी झकास पोरगी पटली
अनुराधा - लाडीगोडी अशी केलीस की
पतंग माझी कटली ||२||

किशोर - गुलाबाची लाली तुझ्या
गालावरी कशी आली ग
ओठात लपली प्रीती ही आपुली
लाजेनं बहरून आली ग

अनुराधा - प्रेमाच्या या खाणा खुणा
मुक्याने घ्याव्या जाणून
डोळ्यात टिपलं मनात जपलं
प्रितीच फूल मी गोडीनं

किशोर - अग हेमा ऽ ऽ ऽ

अनुराधा - माझ्या प्रेमा ऽ ऽ ऽ

किशोर - तुझी माझी जोडी जमली ग
कशी झकास पोरगी पटली

अनुराधा - लाडीगोडी अशी केलीस की
पतंग माझी कटली ।। ३ ।।

**चित्रपट - माझा पती करोडपती**

# कान्हा ऽ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ कान्हा

संगीत -

गीत -

अनुराधा - कान्हा ऽ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ कान्हा
कान्हा रे ऽ ऽ ऽ का ऽ ऽ ऽ न्हा
नंदकिशोरा चित्तचकोरा
गोकुळाचा राव मनमोहन तूं
बावरी राधा मी ब्रिजबाला
प्रेमरसाची ओढ जिवाला
ओ कृष्ण कन्हैय्या अशी लाविसी तू ।।धृ०।।

कृष्णा कृष्णा हरे कृष्णा
राधे कृष्णा कृष्णा कृष्णा

कोरस - कृष्णा कृष्णा हरे कृष्णा
राधे कृष्णा कृष्णा कृष्णा

अनुराधा - वृंदावनी गोप गौळणी
घेऊनीया धुंद रास खेळसी तू
पानातुनी वेलीतुनी

बासरीचे सूर गोड छेडिसी तू
त्याच सुरांनी मोहुनी गेले
पाहुनी तुजसी मी तुझी झाले
वेड मनाला असे लाविसी तू ॥ १ ॥

कोरस - कृष्णा कृष्णा हरे कृष्णा
राधे कृष्णा कृष्णा कृष्णा
अनुराधा - राधा तुझी मीरा तुझी
होईन मी श्याम तुझी दासी रे
प्रीती अशी भक्ति अशी
लाभली ही आज मधुमासी रे
तूच मुकुंदा माधव माझा
मुग्ध मनाचा श्रीहरी राजा
लोचनी माझ्या असा राहसी तू ॥ २ ॥

नंदकिशोरा चित्तचकोरा
गोकुळाचा राव मनमोहन तू
कोरस - कृष्णा कृष्णा हरे कृष्णा
राधे कृष्णा कृष्णा कृष्णा
अनुराधा - कान्हा ऽ ऽ ऽ रे ऽ ऽ का ऽ ऽ ऽ न्हा
कान्हा रे ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ कान्हा

**चित्रपट - माझा पती करोडपती**

# घुमला ऽ ऽ हृदयी निनाद हा

संगीत - दत्ता डावजेकर

गीत - आरती प्रभू

हो ऽ ऽ ऽ हो ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ
घुमला ऽ ऽ ऽ हृदयी निनाद हा ऽ ऽ ऽ
झन् झन् झन् झरत नाद
झरत नाद हा ऽ ऽ ऽ ।।धृ०।।

मी ऽ ऽ ऽ ऽ मन हो बावरी, बावरी
हो ऽ ऽ हो ऽ ऽ
मी ऽ ऽ ऽ मन हो बावरी बावरी
घे गुंफुन घे ऽ ऽ मजला करी २
मिठीमध्ये घे रे तू सत्वरी
मज मिठीत घे आता श्रीहरी
जडू दे ऽ ऽ ऽ ऽ मदन बाधा
घुमला ऽ ऽ हृदयी निनाद हा ऽ ऽ ।।१।।
दाटली सावली झोंबतो गारवा

कुंतली माळिला प्रीतीचा पारवा
श्वास हा रे ऽ ऽ तुझा भासतो मारवा
पापणीत उमटू दे पडसाद हा
पडसाद हा पडसाद हा
घुमला ऽ ऽ ऽ हृदयी निनाद हा ॥ २ ॥

**चित्रपट - यशोदा**

# इंद्रबनातील मी पाकोळी

संगीत - दीपक पाटेकर

गीत - प्रवीण दवणे

सुरेश - प्रेम मंगल प्रेम कोमल
प्रेम वत्सल भावना
प्रेम हासू प्रेम आंसू
प्रेम तेज च्छेदना
प्रेम विरही जागणारे
प्रेम हृदयी तेवणारे
प्रेम शब्दातीत आहे
या दिशांना वेढणारे
अंकुराचे श्वास प्रीती
डोलणारे फूल प्रीती
प्रेम सुक्तातील ओळी
प्रेमीजन हे नित्य गाती
ओम शांती: शांती: शांती:

अनुराधा - इंद्रबनातील मी पाकोळी
जोगी झाला भ्रमर कुणी

प्रेम हे ऽ ऽ ऽ जीवन जाण रे
प्रेम हा ऽ ऽ ऽ आता प्राण रे
इंद्रवनातील मी पाकोळी
जोगी झाला भ्रमर कुणी ॥धृ०॥

मी तर मीरा झुरणारी
होईन राधा भुलणारी
सजूनी आले सुमनांगी
श्वास तुझा मी जगणारी
प्रणयी जग हे राहू दे रे
श्रृंगारातील सुगंध होऊन
मन पवना तूं जाग रे ॥१॥

इंद्रवनातील मी पाकोळी
जोगी झाली भम्रर कुणी
सुरेश - ला ऽ ऽ ऽ ला ऽ ऽ ऽ ल ल ल ला ऽ ऽ ऽ
अनुराधा - प्रेममयी मी प्रेममयी तूं
स्पर्शातूनी बघ गंधीत हेतू
सरला घन हा प्रेमजलाचा
कळला मज रे अर्थ जिण्याचा
मन मोहक हा पथ प्रेमाचा

मोहर झुलतो कल्पतरूंचा
स्वरगंगेतील कमलकळी मी
मरंद हळवा माग रे ॥२॥
इंद्रबनातील मी पाकोळी
जोगी झाला भम्रर कुणी

: चित्रपट - अंगार

# रात अशी ही

| संगीत - | गीत - |
|---|---|

अनुराधा - ॐ ऽ ऽ ऽ ॐ ऽ ऽ ऽ ला ऽ ऽ ऽ ला ऽ ऽ ला ऽ ला
रात अशी ही प्रीत रसिली
तू असा दूर कां सजणां ये ना
ओ ऽ ऽ रात अशी ही प्रीत रसिली ॥धृ०॥

बेधुंद ही धुंद स्वप्नाळली रातराणी
ताऱ्यात वाऱ्यात पाण्यापरी प्रेमगाणी
सचिन - ॐ ऽ ऽ हूं ऽ ऽ ऽ हूं ऽ ऽ
ओ ऽ ऽ मी इथे प्रीत दे सजणी
ओ ऽ ऽ रात अशी ही प्रीत रसिली
मी इथे प्रीत दे सजणी ये ना ॥ १ ॥

सचिन - नयनात अधरात हृदयात तूं तूच राणी
भाळी तुझ्या लावितो चांदणी ही निशाणी
अनुराधा - ॐ ऽ ऽ ऽ हुं ऽ ऽ ऽ हुं ऽ ऽ
ओ ऽ ऽ मी तुझी स्वामिनी सजणा ये ना ॥ २ ॥

अनुराधा - ओ ऽ ऽ ऽ रात अशी ही प्रीत रसिली
तूं असा दूर का सजणा ये ना

सचिन - ओ ऽ ऽ रात अशी ही प्रीत रसिली
मी इथे प्रीत दे सजणी ये ना

**चित्रपट - माझा पती करोडपती**

# ऋतु हसताना

संगीत -

गीत -

ऋतु हसताना तूं असताना बहर लुटू चल ये ना
धिनक धिन तन्नाना फुलली धरा हस ना जरा
अरे तूं ही फुलारून ये ना धिनक धिन तन्नाना ।।धृ०।।

रानात पानात मस्ती अशी बेभान वेळी का सुस्ती अशी
फुलवेल बिलगे तरूला जशी उमलून आली ही प्रीती तशी
मी ही लता येना आता सारे बंध झुगारून ये ना ।। १ ।।

तालातला सूर सोडू नको मस्ती भरा राग तोडू नको
रंगलेली मैफील मोडू नको प्रीतीची ही रेघ खोडू नको
ये ना जरा गा ना जरा नवरंग सूरातून दे ना ।। २ ।।

चित्रपट - माझा पती करोडपती

# दिसते मजला सुखस्वप्न

संगीत - अनिल अरुण

गीत - शांता शेळके

आ ऽऽ ऽ ऽ आ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ
दिसते मजला सुखस्वप्न नवे
मी संसार माझा रेखिते ।।धृ०।।

प्रीत तुझी माझी फुलावी
या फुलत्या वेलीपरी
भाव मुके ओठात यावे
गंध जसा सुमनांतरी
शब्दविना मन भावना
अवघ्याच मी तुज सांगते
दिसते मजला सुखस्वप्न नवे ।।१।।

हात तुझा हाती असावा
साथ तुझी जन्मांतरी
मी तुझिया मागून यावे
आस ही माझ्या उरी

तुज संगती क्षण रंगती
निमिषात मी युग पाहते
दिसते मजला सुखचित्र नवे ॥२॥

स्वर्ग मिळे धरणीस जेथे
रंग नवे गगनांगणी
सप्तसुरा लेवून यावी
रागिणी अनुरागिणी
तुझिया सवे सुख वैभवे
सौभाग्य हे नित पाहते
दिसते मजला सुखस्वप्न नवे ॥३॥

**चित्रपट - अष्टविनायक**

# रेखिले मनात जे

संगीत -

गीत -

तो - ओ ऽ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ ऽ आ ऽ ऽ ऽ
रेखिले मनात जे चित्र ते पुसायचे
पिऊन आसवे मुकी दूर दूर जायचे ।।धृ०।
तो - ओ ऽ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ओ ऽ ऽ
ती - उगम पावलाच का झरे सुकुन आटले.
उमलले न तोवरी कळीत फूल गोठले
तो - उदास ह्या सुन्या सुन्या दिशातुनी फिरायचे
पिऊन आसवे मुकी दूर दूर जायचे ।।१।।
तो - जायचे कुणी बळी कुणास मार्ग मोकळा
हीच रीत येथली हाच न्याय येथला
ती - फुलायचे कुठे कुणी कुठे कुणी सुकायचे
पिऊन आसवे मुकी दूर दूर जायचे ।।२।।
दोघे - रेखिले मनात जे चित्र ते पुसायचे
पिऊन आसवे मुकी दुर दुर जायचे

चित्रपट - सावित्री

# ते बंध चांदण्याचे

संगीत - सदाशिव गुजर

गीत - अं. ब. कोळी

ते बंध चांदण्याचे माझ्या पदी असे ते
सौख्यात दुःख माझे माझेच मी पाहाते ।।धृ०।।

लावून वेड जीवा बंदिस्त तूच केले
सहवास तव सुखाचा पोहून मीच गेले
भंगून प्रीत जाता नयनात आसू येते ।।१।।

मीलनात, मी सरिता या अथांग सागरी
कळलेच नाही मजला तव भेद अंतरी
अस्तित्वहीन होता शून्यात शोधिते ।।२।।

चित्रपट - आई तुळजाभवानी

# नवतीच्या रानात

संगीत - श्रीकांत नरोले

गीत - श्रीकांत नरोले

ती - ओ हो ओ ऽ ऽ ऽ ऽ
तो - ओ हो ओ ऽ ऽ ऽ ऽ
दोघे - ओ हो ऽ ऽ ऽ ओ ऽ ऽ ऽ
ती - नवतीच्या रानात लाजऱ्या पानात
सांगतय कानात
तो - तुझं माझं नातं जुळतय गं
ती - ए, कुणीतरी चोरून बघतयं रं
तो - एं ऽ ऽ तू लांडोरी मी मोर ।।धृ०।।
ती - लई मी लाजाळू हात नको धरू
नजरेच्या बाणानं घायाळ नको करू
तो - झुडपामधनं चल ग फिरू
मंजुळा जराशी गंमत करू
ती - दाटतेय चोळी हाय मी भोळी
काय तरी मनात येतयं रं ।।१।।

ती - गुलाब फुललाय माझ्या गालावरी
खुडून तू घेऊ नको वरच्यावरी
तो - खेटून खेटून चाल गं पोरी
सपान लपलंय माझ्या उरी
ती - छेडाछेडी लाडीगोडी
धक धक काळीज करतयं रं ॥२॥

ए ऽ ऽ कुणीतरी चोरून बघतयं रं
तो - ए ऽ ऽ तू लांडोरी मी मोर
ती - मला मी हरवून गेले रे
आज तुझी मी झाले रे
तो - फुलावर भुंगा फिरतोया
कायतरी निराळं सांगतोया
ती - जवळ ये मिठीत घे
दोघांच नातं पटतयं रे ॥३॥

**चित्रपट - फुकटचंबु बाबुराव**

# नाथांचे हे घर

संगीत - सदाशिव गुजर

गीत - अं. ब. कोळी

नाथांचे हे घर आहे अतिसुंदर
मज नाही उणे येथे, दिसे सुखाचे भांडार ।।धृ०।।

परसात हंबरे कृष्णधवल धेनू
मन मोहुनिया घेई सप्त सुरांची ही वेणू
उपाळीते वेडी प्रीत, मुके मुके जागर
मज नाही उणे येथे दिसे सुखाचे भांडार ।।१।।

तुळस अंगणात फुले हिरवीगार
हेची मागणे देवा ओटी भर लवकर
सांजसकाळी माझ्या पतीची मी चाकर
मज नाही उणे येथे दिसे सुखाचे भांडार ।।२।।

चित्रपट - आई तुळजाभवानी

# सांगु कशी प्रिया मी

संगीत - प्रभाकर जोग

गीत - जगदीश खेबुडकर

ती - सांगु कशी प्रिया मी
माझे मला कळेना
तो - हळुवार भावना ही
शब्दास आकळेना ||धृ०||

तो - एकांत आगळा हा
ही वेगळीच रात
ती - चाहुल काय बाई
बाहेर की मनात
तो - संकोच लाजरीचा
अजुनी कसा ढळेना
ती - सांगु कशी प्रिया मी
माझे मला कळेना ||१||

ती - लज्जा अबोल झाली
डोळेच बोलू दे रे

अपुरा अधीर श्वास
हृदयास तोलू दे रे
तो - उकलून पाकळी ये
परी फूल हे फुलेना
ती - सांगू कशी प्रिया मी
माझे मला कळेना ।।२।।

तो - नवखा तुझ्या परि मी
नवखी मनात धुंदी
ती - माझ्या तुझ्या सभोती
भरले धुके सुगंधी
दोघे - मधुरात मीलनाची
फिरूनी अशी मिळेना
ती - सांगु कशी प्रिया मी
माझे मला कळेना ।।३।।

चित्रपट - सतीची पुण्याई

# सजा ही का अपराधाविना

संगीत -

गीत -

सजा ही का अपराधाविना
सांग रे माझा काय गुन्हा ॥धृ०॥

मी प्रेम एकदा केले ते नकळत घडुनी गेले
मी तिलांजली त्यावरी देऊनी पुसल्या साऱ्या खुणा
सांग रे माझा काय गुन्हा ॥१॥

मी सात पाऊले आले अन् तुझीच केवळ झाले
मी स्पर्श होऊना दिला कुणाचा स्वप्नीही या मना
सांग रे माझा काय गुन्हा ॥२॥

रे तुझ्यात माझी आस दे मला तुझा विश्वास
ही आंसवेच सांगतील तुजसी माझ्या संवेदना
सांग रे माझा काय गुन्हा ॥३॥

**चित्रपट - सावित्री**

# माऊलीच्या भेटीसाठी

संगीत -

गीत -

माऊलीच्या भेटीसाठी आतुरला जीव
विठू तुझ्या राऊळाची वाट मला दाव ।।धृ०।।

दाणे दळिता कांडिता घेई तुझे नांव
पाणीयासी जाता पाही तुझा वर्ण श्याम ----२
रानीवनी दाटे देवा तुझे गोड नाम ।।१।।

पाडसाचे हंबरणे नाही ऐकिसी कां
माय लेकरा टाकून दूर राहसी का
श्वास दाटूनिया आला बावरला जीव ।।२।।

माऊलीच्या भेटीसाठी आतुरला जीव
विठू तुझ्या राऊळाची वाट मला दाव.

चित्रपट -

# मी सूर छेडिता

संगीत - श्रीधर फडके

गीत - रोहिणी निनावे

तो - मी सूर छेडिता, तू माझ्या सुरात गावे
आसमंतातुनी या गाणे नवे जुळावे
ती - तू सूर छेडिता शब्दात अर्थ यावे
आसमंतातूनी या गाणे नवे जुळावे ॥धृ०॥

ती - रातराणीच्या फुलांनी देह गंध भारला
तो - वाटते संपू नये हा मीलनाचा सोहळा
ती - नीज येता सुखाची हलकेच तू जागवावे
तो - आसमंतातूनी या गाणे नवे जुळावे
ती - तू सूर छेडिता ॥१॥

तो - चांदण्याची शाल देही भोवती निळे धुके
ती - ओठ होती मुके जेंव्हा स्पर्श होती बोलके
तो - दान या क्षणाचे न मागता मिळावे
आसमंतातुनी या गाणे नवे जुळावे ॥२॥

दोघे - तू सूर छेडिता शब्दात अर्थ यावे
आसमंतातुनी या गाणे नवे जुळावे

## हंसत खेळत

टी. व्ही. सिरियल

# मी कशी ओळखू प्रिती

संगीत - प्रभाकर जोग

गीत - जगदीश खेबुडकर

अनुराधा - मी कशी ओळखू प्रीती, हे हृदय म्हणू की लेणे
सुरेश - प्रेमाला उपमा नाही, हे देवाघरचे देणे ।।धृ०।।

अनुराधा - हिरवेपण पिऊनी ओले, थेंबाचे मोती झाले
मी कशी फुलांना शोधु, हे फूल म्हणू की पाने
सुरेश - प्रेमाला उपमा नाही, हे देवाघरचे देणे ।।१।।

अनुराधा - किरणांची घेऊन लाली, हे मेघ उतरले खाली
मी कशी ओळखू जादू, हे परिस म्हणून की सोने
सुरेश - प्रेमाला उपमा नाही, हे देवाघरचे देणे ।।२।।

अनुराधा - कां नकळत डोळे मिटती, स्पर्शात शहारे उठती
मी कशी भावना बोलू, हे शब्द म्हणू की गाणे
सुरेश - प्रेमाला उपमा नाही, हे देवाघरचे देणे ।।३।।

चित्रपट - कैवारी

# स्वप्नात चांदण्याच्या

संगीत - प्रभाकर जोग

गीत - जगदीश खेबुडकर

सुरेश - स्वप्नात चांदण्याच्या, जणू पौर्णिमा दिसावी
होऊन आज राधा, माझी प्रिया हसावी ।।धृ०।।

कुजबुजली ही पाने फुले ग, गुपित राधिके मला कळे ग
अवचित धागा कसा जुळे ग, ही रेशिमगाठ असावी
होऊन आज राधा, माझी प्रिया हसावी ।।१।।

अनुराधा- मी मनहरिणी मी वनराणी, भ्रमर छेडितो गुंजत गाणी
माठ थरथरे निथळे पाणी, माझी लाज रूसावी
सुरेश - होऊन आज राधा, माझी प्रिया हसावी ।।२।।

सुरेश - शृंगाराच्या निबिड वनाचे, जपतप सारे खेळ मनाचे
डोळे मिटुनी ध्यान कुणाचे, प्रतिभा शकुंतलेची होऊन मेनका ही

होऊन आज राधा, माझी प्रिया हसावी ।।३।।

चित्रपट - जावयाची जात

# अरुण दाते

## यांची

## गाजलेली गाणी

योगेश्वर प्रकाशन, डोंबिवली (पूर्व)

## अनुक्रमणिका

# अरुण दाते

## भावगीते


| | | | |
|---|---|---|---|
| वाहणाऱ्या आसवांची | १ | मान वेळावूनी | १९ |
| दिस नकळत जाई | २ | भेट तुझी माझी स्मरते | २० |
| रंग संध्याकाळचे गेलेत कुठे | ३ | शहाण्याने आपुले थडगे | २२ |
| दूर दूर चांदण्यात | ४ | सूर मागू तुला मी कसा | २३ |
| दिवस तुझे हे फुलायचे | ५ | धुके दाटलेले उदास | २४ |
| स्वरगंगेच्या काठावरती | ६ | अखेर ते येतील माझ्या | २५ |
| या जन्मावर या जगण्यावर | ७ | देवाघरच्या फुला | २७ |
| भातुकलीच्या खेळामधले | ८ | सांज रंगात रंगून जाऊ | २९ |
| डोळ्यात सांजवेळी | ९ | जेंव्हा तिची नि माझी | ३१ |
| सखी शेजारिणी | १० | आज हृदय मम | ३२ |
| अश्रु जलात विरली | ११ | संधीकाली या अशा | ३३ |
| हिरव्या हिरव्या गवतावरती | १२ | डोळे कशासाठी | ३५ |
| आलो इथे कशाला | १३ | तुला लाजलेली अशी | ३७ |
| किती तुझ्यावर करतो प्रिती | १४ | सर्व सर्व विसरु दे | ३९ |
| रडतच आलो येताना | १५ | श्रीराम जय राम | ४१ |
| हिरव्या तरुराजीत तिथे | १६ | हात तुझा हातात अन् | ४२ |
| दिल्या घेतल्या वचनांची | १७ | पहिलीच भेट झाली | ४४ |
| जपून चाल पोरी | १८ | शुक्रतारा मंद वारा | ४५ |

# वाहणाऱ्या आसवांची

संगीत - दशरथ पुजारी

गीत - सौमित्र

वाहणाऱ्या आसवांची, जीवनी बरसात आहे
वेदनेला अंत नाही, ही अशी सुरुवात आहे ।।धृ०।।

का मला जगता न आले, शांत हे आयुष्य साधे,
दूर ते आयुष्य गेले, राहिलो पण मीच मागे,
सोडूनिया हात माझा, दिवस हे सरतात आहे ।।१।।

आगळे अन् वेगळे हे, गाव जेथे मी रहातो,
भेटतो जो या इथे तो, घेऊनी जखमाच जातो,
हे जिणे जगणे जणू, जाहले अपघात आहे ।।२।।

जायचे होते कुठे, मी चाललो आहे कुठे,
ओळखीचा मीच मजला, राहिलो नाही इथे,
यात माझ्या आरशाचा, कोणता अपराध आहे ।।३।।

• • •

# दिस नकळत जाई

संगीत - मिलींद इंगळे

गीत - सौमित्र

दिस नकळत जाई, सांज रेंगाळुन राही,
क्षण एकही न ज्याला, तुझी आठवण नाही ॥धृ०॥

भेट तुझी ती पहिली, लाख लाख आठवतो,
रूप तुझे ते धुक्याचे, कण कण साठवतो,
वेड सखी साजणी हे, मज वेडावुन जाई ॥१॥

असा भरुन ये ऊर, जसा वळीव भरावा,
अशी हुरहुर जसा गंध रानी पसरावा,
रान माझ्यातले माझ्या मग भिजुनिया जाई ॥२॥

आता अबोध मनाची, अनाकलनीय भाषा,
जशा गूढ गूढ, माझ्या तळहातावर रेषा,
असे आभाळ आभाळ रोज पसरुन राही ॥३॥

• • •

# रंग संध्याकाळचे गेलेत कोठे

संगीत - दीपक पाटेकर

गीत - प्रवीण दवणे

आ ऽऽऽ  आ ऽऽऽ
रंग संध्याकाळचे गेलेत कोठे सांग ना,
द्यायचे आहे मला जे, एकदा तू माग ना ।।धृ०।।

दूर एकांतात येथे बोलती ही आसवे
आंधळ्या गावास एका साद देती काजवे
सोबतीला आज आहे तोडणारी वंचना ।।१।।

जाणती झाली तरूंची गोठणारी साऊली,
भास हे कवळून आली ही दिसांची काजळी,
केशरी ओढाळ गाणी एकदा तूं छेड ना ।।२।।

बोलता ही येत नाही, ते तुला सांगु कसे?
ज्यात मी सुख पाहिले ते वेदनेचे आरसे,
मी जिव्हारी झेलले ते घाव थोडे मोज ना ।।३।।

● ● ●

# दूर दूर चांदण्यात

संगीत - दशरथ पुजारी

गीत - सुरेश भट

दूर दूर चांदण्यात, मी असाच हिंडतो
मी असाच हिंडतो
तारकास हालचाल मी तुझी विचारतो ॥धृ०॥

वाटते कधी चुकून, भेटशील तू अजून,
थांबतो पुन्हा मधून, अन् उगीच सावल्यात
सैरभैर पाहतो ॥१॥

चाललो असेच गात, ऐकते उदास रात
चंद्रमा झुरे नभात, अन् इथे फुलाफुलात
मी तुलाच शोधितो ॥२॥

वेड लागले जिवास, हे तुझे दिशात भास,
हा तुझा मनी सुवास, आपुल्याच आसवांत
मी वसंत ढाळितो ॥३॥

• • •

# दिवस तुझे हे फुलायचे

संगीत - यशवन्त देव

गीत - मंगेश पाडगांवकर

दिवस तुझे हे फुलायचे,
झोपाळ्या वाचुन झुलायचे ।।धृ०।।

स्वप्नात गुंगत जाणे,
वाटेत भेटते गाणे
गाण्यात हृदय झुरायचे ।।१।।

मोजावी नभाची खोली,
घालावी शपथ ओली,
श्वासात चांदणे भरायचे ।।२।।

थरारे कोवळी तार
सोसेना सुरांचा भार
फुलांनी जखमी करायचे ।।३।।

माझ्या या घराच्या पाशी,
थांब तू गडे जराशी,
पापण्या मिटून झुलायचे ।।४।।

• • •

६

# स्वरगंगेच्या काठावरती

संगीत - हृदयनाथ मंगेशकर

गीत - शंकर वैद्य

स्वरगंगेच्या काठावरती
वचन दिले तूं मला
गत जन्मीची खूण सापडे
ओळखले कां मला ।।धृ०।।

वदलीस तूं, मी सावित्री ती,
शकुंतला मी, मी दमयंती,
नांव भिन्न परी, मी ती प्रीती,
चैतन्याचा पूर तेधवा,
गंगेला पातला ।।१।।

अफाट जगती जीव रज:कण,
दुवे निखळता कोठून मीलन,
जीव भुकेला हा तुजवाचून,
जन्मामधूनी पिसाट फिरता,
भेट घडे आजला ।।२।।

• • •

# या जन्मावर या जगण्यावर

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे
शतदा प्रेम करावे ।।धृ०।।

चंचलवारा या जलधारा, भिजली काळी माती,
हिरवे हिरवे प्राण तशी ही, रुजून आली पाती,
फुले लाजरी बघुन कुणाचे हळवे ओठ स्मरावे ।।१।।

रंगाचा उघडूनिया पंखा, सांज कुणी ही केली
काळोखाच्या दारावरती नक्षत्रांच्या वेली,
सहा ऋतूंचे सहा सोहळे येथे भान हरावे ।।२।।

बाळाच्या चिमण्या ओठातुन हाक बोबडी येते
वेलीवरती प्रेम प्रियेचे जन्म फुलांनी घेते,
नदीच्या काठी सजणासाठी गाणे गात झुरावे ।।३।।

या ओठांनी चुंबुन घ्यावी, हजारदा ही माती,
अनंत मरणे झेलून घ्यावी, इथल्या जगण्यासाठी,
इथल्या पिंपळ पानावरती, अवघे विश्व तरावे ।।४।।

• • •

# भातुकलीच्या खेळा मधली

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

भातुकलीच्या खेळा मधली राजा आणिक राणी
अर्ध्यावरती डाव मोडिला, अधुरी एक कहाणी ।।धृ०।।

राजा वदला मला समजली शब्दावाचून भाषा,
माझ्या नशिबासवे बोलती तुझ्या हातच्या रेषा,
कां राणीच्या डोळा तेंव्हा दाटून आले पाणी ।।१।।

राणी वदली बघत एक टक, दूरदूरचा तारा,
उद्या पहाटे दुसऱ्या वाटा, दुज्या गावचा वारा,
पण राजाला उशिरा कळली, गूढ अटळ ही वाणी ।।२।।

तिला विचारी राजा, कां हे जीव असे जोडावे,
कां दैवाने फुलण्या आधी फूल असे तोडावे,
या प्रश्नाला उत्तर नव्हते राणी केविलवाणी ।।३।।

कां राणीने मिटले डोळे दूर दूर जाताना,
कां राजाचा श्वास कोंडला, गीत तिचे गाताना,
वाऱ्यावरती विरून गेली, एक उदास विराणी ।।४।।

• • •

९

# डोळ्यांत सांजवेळी

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

डोळ्यांत सांजवेळी आणू नकोस पाणी,
त्या दूरच्या दिव्यांना, सांगू नको कहाणी ॥धृ०॥

कामात गुंतलेले असतील हात दोन्ही,
तेंव्हा नको म्हणू तूं, माझी उदास गाणी ॥१॥

वाटेवरी खुणेच्या शोधू नको फुले ती,
ना ठेविते फुलांची, माती इथे निशाणी ॥२॥

कळणार हाय नाही, दुनिया तुला मला ही,
मी पापण्यात माझ्या, ही झाकिली विराणी ॥३॥

• • •

# सखी शेजारिणी

संगीत - वसंत प्रभू

गीत - वा.रा. कांत

सखी शेजारिणी, तू हसंत रहा,
हसत रहा, हास्यात पळे गुंफित रहा ।।धृ०।।

दीर्घ बदामी शामल डोळे,
एक सांद्र घन स्वप्न पसरले,
धूपछाव मधी यौवन खेळे,
तूं जीवन स्वप्ने रचित रहा ।।१।।

सहज मधुर तूं हसता वळूनी,
स्मित किरणी धरी क्षितिज तोलूनी,
विशाद मनीचा जाय उजळूनी,
तूं वीज खिन्न घनी लवत रहा ।।२।।

मूक जिथे स्वर गीत होतसे,
हास्य मधुर तव तिथे स्फुरतसे,
जीवन नाचत गात येतसे,
स्मित चाळ त्यास बांधून पहा ।।३।।

• • •

# अश्रु जलात विरली

संगीत - अनिल मोहिले

गीत - वंदना विटणकर

अश्रु जलात विरली, गाथा जुन्या खुणांची,
ओठावरीच मिटली, ती साद अंतरीची ।।धृ०।।

धुंदावल्या मनाला होता बहार आला,
नयनी फुले तराणा कैफात भारलेला,
परी ओसरुन गेली माया खुळ्या क्षणांची ।।१।।

तुटण्यास का जुळाल्या वाळूवरील वाटा,
दूरात लोपल्या कां, उसळून दोन लाटा,
कां पालवी जळाली फुलल्या मनोगताची ।।२।।

गोठून अश्रू गेले, थिजली गळ्यात भाषा,
प्रीतीविना जिण्याची नुरली मनात आशा,
आता वळून गेली जाणीव जीवनाची ।।३।।

• • •

१२

# हिरव्या हिरव्या गवतावरती

संगीत - मिलिंद इंगळे

गीत - सौमित्र

हिरव्या हिरव्या गवतावरती, आ ऽऽऽ आ ऽऽऽ आ ऽऽऽ,
चंद्र असावा निथळत निथळत, चांदण्यात त्या तुझे न माझे,
प्रेम असावे उजळत उजळत ॥धृ०॥

गार सुटावा वारा आणिक मीच मला विसरावे,
हाती घेता हात तुझे तव, अंग असे बहरावे,
खांद्यावरी तू मान ठेवूनी, हळूच यावे बिलगत बिलगत ॥१॥

हृदयाची ती धडधड अपुल्या  हळूहळू वाढावी,
स्पर्शातुनी मी मनोव्यथा मग हळूच तुला सांगावी,
मिठीत माझ्या तुझे न माझे, श्वास असावे मिसळत मिसळत ॥२।

नयनी तुझीया मला सखे तू, रोज विसावा द्यावा,
स्वर्गसुखाचा अपूर्ण क्षण तो कधीच ना संपावा
संसाराचे तुझ्या न माझ्या स्वप्न बसावे सजवत सजवत ॥३॥

• • •

# आलो इथे कशाला

संगीत - रवी दाते

गीत - मंगेश पाडगांवकर

आलो इथे कशाला, माझे मला कळेना;
या बेगडी जगाशी, हा सूर ही जुळेना ॥धृ०॥

झेलून घाव सारे केली अपार प्रीती,
पण प्रीतीचा हिशोबी व्यवहार आकळेना ॥१॥

मी हाक घातली, अन् माझेच शब्द आले,
माझेच शब्द आले, मी हाक घातली अन्
मी हाक घातली अन्
माझ्या घरावरून काळोख हा ढळेना ॥२॥

मी आसवात माझ्या ही रात्र चिंब केली,
पण ध्यास लागलेला, तो चंद्र आढळेना ॥३॥

• • •

# किती तुझ्यावर करतो प्रिती

संगीत - अरुण पौडवाल

गीत - शांताराम नांदगांवकर

किती तुझ्यावर करतो प्रिती, मला कळत नाही;
इतुके उमजे सखे तुझ्याविण, सूर जुळत नाही;
ओ ऽऽ सूर जुळत नाही ॥धृ०॥

सुगंध पेरीत सखे चालशी, डोळ्यांनी हळूवार बोलशी,
तुझ्यावाचुनि मन वेलीचे, पान हलत नाही ॥१॥

अशी नको तू विषण्ण राहू, मिटून पापण्या तमात पाहू,
तालसूरांना तू नसताना, गीत मिळत नाही ॥२॥

तुझ्या स्मृतीविण क्षण जातो, जिथे तिथे मी, जिथे तिथे मी,
तुलाच बघतो, तुला सोडूनी कुठे दूरवर, पाय वळत नाही ॥३॥

• • •

# रडतच आलो येताना

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

रडतच आलो येताना, पण हासत जावे जाताना ।।धृ०।।

अंगावर आसुड विजेचे, झेलून घेती घन वर्षेचे,
सार्थक झाले कोसळण्याचे तृषित धरित्री न्हाताना ।।१।।

हासत हासत ज्योती जळाली, काळोखाची रात्र उजळली,
पहाट झाली तेंव्हा नव्हती, तेजोमय जग होताना ।।२।।

बीज आतूनी फुटुनी गेले, वेदनेत या फूल जन्मले
अमरपणाचा अर्थ आकळे मरण झेलुनी घेताना ।।३।।

कुणी दु:खाचा घोट घेतला खोल व्यथेने प्राण पेटला
त्या दु:खाचे झाले गाणे जीव उधळुनी गाताना ।।४।।

• • •

# हिरव्या तरुराजीत तिथे

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

हिरव्या तरुराजीत तिथे उभी राहशील कां
हासत होतीस पूर्वी तशी पुन्हा हासशिल कां ॥धृ०॥

किलबिल तिथल्या पानोपानी फुलासारखे कोमल पाणी
वनराणी होऊन तिथे मला पाहशिल कां ॥१॥

दे शब्दांची उधळून दौलत पूर्ण कधीही नाही उमलत
अबोध ते मौनातुन तु मला सांगशिल कां ॥२॥

हसरे सुंदर डोळे जडवून  निळ्या जळापरी अथांग होऊन
कधी न सुटणारे कोडे पुन्हा घालशिल कां ॥३॥

• • •

# दिल्या घेतल्या वचनांची

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

दिल्या घेतल्या वचनांची शपथ तुला आहे
मनातल्या मोरपिसाची शपथ तुला आहे ।।धृ०।।
बकुळीच्या झाडाखाली निळ्या चांदण्यात
हृदयाची ओळख पटली सुगंधी क्षणात
त्या सगळ्या बकुळ फुलांची, शपथ तुला आहे ।।१।।
शुभ्र फुले रेखित रचिला चांद तू जुईचा
म्हणालीस चंद्रोत्सव हा सावळ्या भुईचा
फुलातल्या त्या चंद्राची, शपथ तुला आहे ।।२।।
भुरभुरता पाऊस होता सोनिया उन्हात
गवतातुनी चालत होतो मोहुनी मनात
चुकलेल्या त्या वाटेची, शपथ तुला आहे ।।३।।
हळुहळु काजळतांना सांज ही सुरंगी
तुझे भास दाटून येती असे अंतरंगी
या उदास आभाळाची, शपथ तुला आहे ।।४।।

• • •

# जपून चाल पोरी

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - मंगेश पाडगांवकर

जपून चाल पोरी जपून चाल
बघणाऱ्या माणसाच्या जीवाचे हाल ॥धृ०॥
लाडाने वळुन बघायची खोड
नाजुक नखऱ्याला नाही या तोड
डोळ्यात काजळ गुलाबी गाल ॥१॥
केसात सुरंगी रंगात गं
रंगात गं ऽ ऽ ऽ ऽ
विजेची लवलव अंगात गं
खट्याळ पदराला आवर घाल ॥२॥
जिंकीत जिंकीत जातेस तू
ज्वानीचं गाणं हे गातेस तू
हासून होतेस लाजून लाल ॥३॥
उरात लागलेत नाचाया मोर
कुणाच्या गळ्याला लागले दोर
माझ्या या काळजाचा चुकेल ताल ॥४॥

• • •

# मान वेळावुनी

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

मान वेळावुनी धुंद बोलु नको
चालताना अशी वीज तोलु नको
ऐक माझे जरा हट्ट नाही खरा
दृष्ट लागेल गं, दृष्ट लागेल गं, दृष्ट लागेल गं
मान वेळावुनी धुंद बोलु नको ।।धृ०।।
आज वारा बने, रेशमाचा झुला
ही खुशीची हवा, साद घाली तुला
मोर सारे तुझे, हे पिसारे तुझे
रुप पाहून गं, चंद्र लाजेल गं
दृष्ट लागेल गं दृष्ट लागेल गं ।।१।।
पाहणे हे तुझे चांदण्याची सुरी
हाय मी झेलली आज माझ्या उरी,
लाट मोठी तुटे शीड माझे फुटे
ही दिशा कोणती, कोण सांगेल गं
कोण सांगेल गं, दृष्ट लागेल गं ।।२।।

• • •

# भेट तुझी माझी स्मरते

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

भेट तुझी माझी स्मरते
अजून त्या दिसाची
धुंद वादळाची होती
रात्र पावसाची ॥धृ०॥

कुठे दिवा नव्हता गगनी
एकही न तारा
आंधळ्या तमातून वाहे
आंधळाच वारा,
तुला मुळी नव्हती बाधा
भीतीच्या विषाची ॥१॥

क्षुद्र लौकिकाची खोटी
झुगारुन् नीती
नावगाव टाकुनी आली
अशी तुझी प्रीती,
तुला परी जाणीव नव्हती
तुझ्या साहसाची ॥२॥

केस चिंब ओले होते
थेंब तुझ्या गाली
ओठावर माझ्या त्यांची
किती फुले झाली
श्वासांनी लिहिली गाथा
श्वासांनी
श्वासांनी लिहिली गाथा
प्रीतीच्या रसाची ।।३।।

सुगंधीत हळव्या शपथा
सुगंधीत श्वास
स्वप्नातच स्वप्न दिसावे
असे सर्व भास,
सुखालाही भोवळ आली
मधुर सुवासाची ।।४।।

• • •

२२

# शहाण्याने आपुले थडगे

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - मंगेश पाडगांवकर

शहाण्याने आपुले थडगे खणावे
आणि खणताना पुन्हा गाणे म्हणावे ।।धृ०।।

जे मुळी नाहीच त्याची ही प्रतिक्षा
व्यर्थ डोळ्यांनी असे येथे शिणावे ।।१।।

सोबतीला राहती जखमाच अंती
लाभता सांध्यातच कोणी कणा रे ।।२।।

गुंतलेले आतडे होते निरुत्तर
डोंगरातून घोष प्रश्नाचा दुणावे ।।३।।

सोशिला काळोख ज्याने तोच जाणे
आपुल्याला आपुला तारा कुणा रे ।।४।।

• • •

# सूर मागु तुला मी कसा

संगीत - हृदयनाथ मंगेशकर

गीत - सुरेश भट

सूर मागु तुला मी कसा
जीवना तूं तसा मी असा ।।धृ०।।

तू मला मी तुला पाहिले
एकमेकास न्याहाळिले
दु:ख माझे तुझा आरसा ।।१।।

एकदाही मनासारखा
तू न झालास माझा सखा
खेळलो, खेळ झाला जसा ।।२।।

• • •

# धुके दाटलेले उदास

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

धुके दाटलेले उदास उदास
मला वेढती हे तुझे सर्व भास ।।धृ०।।

उभी मूक झाडे विरागी किनारा
झुरे अंतरी अन् फिरे आर्त वारा
कुणीही न येथे दिसे आसपास ।।१।।

कुठे चालल्या या दिशाहीन वाटा
कुणा शोधिती या उदासीन लाटा
दिशातून दाटे तुझा एक ध्यास ।।२।।

क्षणी भास होतो तुझे सूर येती
जीवा भारुनी हे असे दूर नेती
स्मृती सोबतीला असा हा प्रवास ।।३।।

• • •

# अखेर ते येतील माझ्या

संगीत - यशवंतदेव

गीत - मंगेश पाडगांवकर

अखेर ते येती माझ्या
हेच शब्द ओठी
लाख चुका असतील केल्या
केली पण प्रीती ।।धृ०।।

इथे सुरु होण्या आधी
संपते कहाणी
साक्षीला केवळ उरते
डोळ्यातील पाणी
जखम उरी ज्यांच्या होते
तेच गीत गाती
लाख चुका - - - ।।१।।

गंध दूर ज्याचा आणिक
जवळ मात्र काटे
असे फुल प्रीती म्हणजे

कधी हाय वाटे
परि धुंद गंधित झाला
जीव तुझ्यासाठी
लाख चुका - - - ॥२॥

सर्व बंध तोडून जेंव्हा
नदी धुंद धावे
मीलन वा मरण पुढे हे
तिला नसे ठावे
एकदाच आभाळाला
अशी भिडे माती
लाख चुका - - - ॥३॥

आर्त गीत आले जर हे
कधी तुझ्या कानी
गूज अंतरीचे कथिले
तुला या स्वरांनी
डोळ्यातून माझ्यासाठी
लाव दोन ज्योती
लाख चुका - - - ॥४।

• • •

# देवा घरच्या फुला

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - गंगाधर महांबरे

देवाघरच्या फुला सोनुल्या
देवाघरच्या फुला ॥धृ०॥

आपुले नाते सांगून येते
बाळ घरी हे रांगत येते
आनंदाने हसत खेळते
झुलविता वारा झुला
देवाघरच्या फुला सोनुल्या
देवाघरच्या फुला ॥१॥

दुडुदुडु धावत हसे चिमुकला
असा जिवाचा माझा छकुला
अवती भवती सुगंध सुंदर
हाक घालीतो तुला
देवाघरच्या फुला सोनुल्या
देवाघरच्या फुला ॥२॥

मायपित्यांनी तुला सोडिले
हृदयाने मम जवळ घेतले
भाग्यवान मी अमोल ठेवा
असा लाभला मला
देवाघरच्या फुला सोनुल्या
देवाघरच्या फुला ॥३॥

• • •

# सांज रंगात रंगून जाऊ

संगीत - प्रभाकर जोग

गीत - शांताराम नांदगांवकर

अरुण दाते - सांज रंगात रंगून जाऊ
ये प्रिये हा दुरावा कशाला
अनुराधा - मलमली रात येऊ दे, थांब ना
चांदण्याचा घेऊन झुला ||धृ०||

अरुण - नभ फुलले ढग झुलले
सागराच्या किनाऱ्यास खग फुलले
अनुराधा - स्वप्नगंधात न्हाऊन आली धरा
अंगअंगी सुखाचाच वाहे झरा
आज आनंद पाना फुलाला
गोजिरे प्रीतीचे गीत गाऊ
लेवूनी चांदण्याची दुशाला
अरुण - सांज रंगात रंगून जाऊ
ये प्रिये हा दुरावा कशाला ||१||

अनुराधा - एक गाणे मनी या फुलपंखी
हो ऽऽ ओ ऽऽऽ हो ऽऽ ओ ऽऽ

एक गाणे मनी या फुलपंखी
आळविते तुझी आज मधुवंती
अरुण - शब्द माझे तुझी ही मधुगीतिका
त्या स्वरातून उमले जणू प्रीती का
पश्चिमेला नवा रंग आला
त्याच रंगात रंगून जाऊ
अनुराधा - मलमली रात येऊ दे थांब ना
चांदण्याचा घेऊन झुला
अरुण - सांज रंगात रंगून जाऊ
ये प्रिये हा दुरावा कशाला ॥२॥

अरुण - स्वर जुळता मन मिळता
रोमरोमी सतारीच झंकारती
अनुराधा - या सुखाने आता प्राण ओलावले
पापण्यांना तुझे ओठ हे स्पर्शले
मीलनाचा असा सोहळा
गोजिरे प्रीतीचे गीत गाऊ
लेवुनी चांदण्याची दुशाला
दोघे - सांज रंगात रंगून जाऊ ॥३॥
ऊं ऽ ऽ ऽ हूं ऽ ऽ ऽ
ला ल ला, ऊं हुं ऽ ऽ ऽ

• • •

# जेंव्हा तिची नि माझी

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

जेंव्हा तिची नि माझी चोरुन भेट झाली
झाली फुले कळ्यांची झाडे भरात आली ।।धृ०।।

दूरातल्या दिव्यांचे मणीहार मांडलेले
पाण्यात चांदण्याचे आभाळ सांडलेले
कैफात काजव्यांची अन् पालखी निघाली ।।१।।

केसातल्या जुईचा तिमिरात गंध होता
श्वासातल्या लयीचा आवेग अंध होता
वेड्या समर्पणाची वेडी मिठी मिळाली ।।२।।

नव्हतेच शब्द तेंव्हा मौनात अर्थ सारे
स्पर्शात चंद्र होता स्पर्शात लाख तारे
ओथंबला फुलांनी अवकाश भोवताली ।।३।।

• • •

# आज हृदय मम विशाल झाले

संगीत - हृदयनाथ मंगेशकर

गीत - शंकर वैद्य

आज हृदय मम विशाल झाले
त्यास पाहुनी गगन लाजले ।।धृ०।।

आज माझिया किरण करांनी
ओंजळीमध्ये धरली अवनी
अरुणाचे मी गंध लाविले ।।१।।

या विश्वाच्या कणाकणातुन
भरुन राहिले अवघे मी पण
फुलता फुलता बीज हरपले ।।२।।

• • •

# संधीकाली या अशा

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - गंगाधर महांबरे

लता - संधीकाली या अशा
धुंदल्या दिशा दिशा
सांज येई अंबरी
अरुण दाते - चांद राती रम्य या
संगती सखी प्रिया
प्रीत होई बावरी
दोघे - संधीकाली या अशा
धुंदल्या दिशा दिशा ।।धृ०।।
अरूण दाते - मुग्ध तू मी मुग्ध मी
अबोल गोड संभ्रमी .... २
एकरुप संगमी
लता - रातराणीच्यामुळे रातराणीच्यामुळे
श्वास धुंद परिमळे
फुलत प्रीतीची फुले फुलत प्रीतीची फुले
अरुण - प्रणयगीत हे असे, कानी ऐकू येतसे
गीती शब्द ना जरी

लता - अरुण - संधीकाली या अशा
धुंदल्या दिशा दिशा ॥१॥
अरुण दाते - साज रंगी रंगुनी नकळताच दंगुनी
नकळताच दंगुनी
हृदय तार छेडूनी
लता - युगुल गीत गाऊनी, युगुल गीत गाऊनी
एकरुप होऊनी
देऊ प्रीत दावूनी, देऊ प्रीत दावूनी
अरुण दाते - प्रणय चित्र हे दिसे, रंग संगती असे
कुंचला नसे जरी
लता - अरुण - संधीकाली या अशा
धुंदल्या दिशा दिशा ॥२॥

• • •

# डोळे कशा साठी

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

तो - डोळे कशा साठी?
ती - कशा साठी?
तो - तुला साठवून मिटुन घेण्यासाठी
हो डोळे कशासाठी ।।धृ०।।
ती - आला भरुन पाऊस
नको एकटा जाऊस
अरे सरी कशासाठी?
सरी कशासाठी?
तो - तुला बिलगून भिजून जाण्यासाठी

तो - हो, डोळे कशासाठी?
तुला साठवून मिटून घेण्यासाठी ।।१।।
तो - नाव तुझे मनातले
चांदणेच रानातले
शब्द कशासाठी?
ती - कशा साठी?

तो - तुला आठवून भरुन येण्यासाठी
डोळे कशासाठी?
तुला साठवून मिटून घेण्यासाठी ।।२।।
ती - वेल मोहरुन आली ....२
फुले अंगभर झाली ....२
ओ ऽऽ वारा कशासाठी?
गंध वनातून पाखरु होण्यासाठी
तो - हो ऽ ऽ डोळे कशासाठी? ।।३।।

तो - असा तुझा भरवसा
चांदण्याचा कवडसा
ओठ कशासाठी
ती - कशा साठी?
तो - कुणी थरारुन गाणे गाण्यासाठी
हो ऽ ऽ डोळे कशासाठी?
तुला साठवून मिटून घेण्यासाठी ।।४।।

• • •

# तुला लाजलेली अशी

संगीत - यशवंत देव

गीत - मंगेश पाडगांवकर

तुला लाजलेली अशी पाहतो
सुखाच्या सुगंधात मी नाहतो ||धृ०||

जराशी लवे बावरी पापणी, बावरी पापणी
फुलांचे उरी बाण मी साहतो
सुखाच्या सुगंधात मी नाहतो ||१||

झुरे शब्द ओठात ओलावला, शब्द ओलावला
अनोखा सुगावा मला बाहतो
सुखाच्या सुगंधात मी नाहतो ||२||

तुझ्या भोवती धुंद वारा फिरे, धुंद वारा फिरे
वसंतातली आर्जवे वाहतो
सुखाच्या सुगंधात मी नाहतो ||३||

कशी नीज माझी फुलांनी भरे ....
माझी फुलांनी भरे
फुलांच्या स्वप्नात मी राहतो
सुखाच्या सुगंधात मी नाहतो ॥४॥

• • •

# सर्व सर्व विसरू दे

| संगीत - | गीत - |
|---|---|

आशा - सर्व सर्व विसरु दे
गुंतवू नको पुन्हा
येथे जीव जडविणे
हाच होतसे गुन्हा ।।धृ०।।

अरुण - हे धुके अशी हवा
ही उदास कां घरे
सूर सूर मिटुनिया
लोपलीत पांखरे
हांस हांस लाडक्या
श्रावणातल्या उन्हा

आशा - सर्व सर्व विसरूं दे ... ।।१।।

आशा - रात्र रात्र जागुनी
वाट पाहिली कुणी
मंद होऊनी विरे
अन् पहाट चांदणी
स्वप्न संपुनी असे

कठोर वंचना
सर्व सर्व विसरू दे .... ।।२।।
अरूण - काय मोर थांबतो
मेघ दाटता शिरी
भान राधिके नुरे
ऐकताच वासुरी
बंधनात जन्मतो
लटिका खरेपणा
हास हास लाडक्या
श्रावणातल्या उन्हा ।।३।।

• • •

# श्रीराम जय राम

| संगीत - | गीत - |
|---|---|

अविरत ओठी यावे नाम
श्रीराम जयराम जय जय राम ॥धृ०॥

रामनाम हे सदा सुखाचे
निधान जाणा परमेशाचे
पतित पावन अवघे नाम
श्रीराम जयराम जय जय राम ॥१॥

जानकीची जणू जीवनज्योती
प्रभूरामाची कोमल मूर्ती
मंगलदर्शन पूर्णविराम
श्रीराम जयराम जय जय राम ॥२॥

पंचप्राण हे पवनसुतांचे
राम जणू नि:श्वास तयांचे
कणकण जीवन सुंदरधाम
श्रीराम जयराम जय जय राम ॥३॥

• • •

# हात तुझा हातात

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - मंगेश पाडगांवकर

अरूण - हात तुझा हातात अन् धुंद ही हवा
रोजचाच चंद्र आज भासतो नवा ऽ ऽ ऽ
सुधा - हात तुझा हातात अन् धुंद ही हवा
रोजचाच चंद्र आज भासतो नवा ऽ ऽ ऽ ।।धृ०।

अरूण - रोजचेच हे वारे रोजचेच तारे
भासते परी नवीन विश्व आज सारे
सुधा - ही किमया स्पर्शाची भारीते जीवा
हात तुझा हातात अन् धुंद ही हवा ऽ ऽ ऽ ।।१।।

सुधा - ह्या हळव्या पाण्यावर मोहरल्या छाया
मोहरले हृदय तसे मोहरली काया
अरूण - चांदण्यात थरथरतो मधुर गारवा
हात तुझा हातात अन् धुंद ही हवा ।।२।।

अरूण - जन्मजन्म दुर्मिळ हा क्षण असला येतो

स्वप्नाच्या वाटेने चांदण्यात नेतो
सुधा - बिलगताच जाईचा उमलतो थवा
हात तुझा हातात अन् धुंद ही हवा ।।३।।

सुधा - क्षणभर मिटले ऽ ऽ डोळे सुख न मला साहे
विरघळून चंद्र आज रक्तातुन वाहे
अरुण - आज झुले रानातुन केशरी दिवा
हात तुझा हातात अन् धुंद ही हवा ।।४।।

दोघे - रोजचाच चंद्र आज भासतो नवा

• • •

# पहिलीच भेट झाली

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - मंगेश पाडगांवकर

अरुण - पहिलीच भेट झाली पण ओढ ही युगांची
जादु अशी घडे ही या दोन लोचनांची ।।धृ०।।

सुमन - पहिलीच भेट झाली, जडली अपूर्व बाधा
स्वप्नात गुंग झाली जागेपणात राधा
मांझी न राहिले मी किमया अशी कुणाची
जादु अशी घडे ही या दोन लोचनांची ।।१।।

अरुण - डोळे मिटून घेता दिसतेस तूं समोर
फुलवून पंख स्वप्नी अन् नाचतात मोर
झाली फुले सुगंधी माझ्या ही पावलांची
जादु अशी घडे ही या दोन लोचनांची ।।२।।

सुमन - लाजून वाजती या अंगातुनी सतारी
ऐश्वर्य घेऊनी हे, ये दैव आज दारी
मी लागले बघाया स्वप्ने ही मीलनाची
जादु अशी घडे ही या दोन लोचनांची ।।३।।

दोघे - पहिलीच भेट घाली पण ओढ ही युगांची
जादू अशी घडे ही या दोन लोचनांची

• • •

# शुक्रतारा मंद वारा

संगीत - श्रीनिवास खळे

गीत - मंगेश पाडगांवकर

अरूण - शुक्रतारा मदवारा
चांदणे पाण्यातुनी
चंद्र आहे स्वप्न वाहे
धुंद या गाण्यातुनी
आज तूं डोळ्यात म झ्या
मिसळूनी डोळे पहा
तूं अशी जवळी रहा ।।धृ०।।

सुधा - मी कशी शब्दात सां
भावना माझ्या तुला
तू तुझ्या समजून घे
लाजणाऱ्या या फुला
अंतरीचा गंध माझा
आज तूं पवना वाहा
तू असा जवळी रहा ।१।।

अरूण - लाजऱ्या माझ्या फुला रे
गंध हा विलगे जिवा

अंतरीच्या स्पंदनाने
अन् थरारे ही हवा
भारलेल्या या स्वरांनी
भारलेला जन्म हा
तू अशी जवळी रहा ॥२॥

सुधा - शोधिले स्वप्नात मी जे
ते ये परी जागेपणी
दाटूनी आलास तू रे
आज माझ्या लोचनी
वाकल्या फांदीपरी
आता फुलांनी जीव हा
तू असा जवळी रहा ॥३॥

• • •

REFBK-0026464